महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास व पंचायत राज विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण



# महा आवास

त्रैमासिक

@MAHAAWAAS www.mahaawaas.org

एप्रिल ते जून २०२४



अर्थसंकल्पात घरकुल योजनांसह इतरही योजनांबाबत घेतलेल्या निर्णयांची माहिती पत्रकार परिषदेत सांगताना मा.मुख्यमंत्री, श्री.एकनाथ शिंदे यांच्यासह मा.उप मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस, मा.उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार, मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन



जळगाव जिल्ह्यात मा.मुख्यमंत्री, श्री.एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन, उद्घाटन व निधी वितरण कार्यक्रमा प्रसंगी मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन व इतर मान्यवर




मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.एकनाथ डवले यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृष्य प्रणालीद्वारे केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांच्या आढावा बैठकी प्रसंगी उपस्थिती अधिकारी



पुणे विभागाचे विभागीय आयुक्त, डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या विभागीय कृती दल (Task Force) बैठकी प्रसंगी उपस्थिती अधिकारी

महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास


| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. एकनाथ डवले, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे<br>संचालक, ग्रामीण गृहनिर्माण,<br>महाराष्ट्र राज्य |
| प्रबंध संपादक | नीलेश काळे, उप संचालक<br>राजलक्ष्मी येरपुडे, उप संचालक<br>सुनिल मोरे, सहा. संचालक (लेखा)<br>अपर्णा पाटणे, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| सहयोगी संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.org |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |


## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | विशेष - महा आवास अभियान २०२३-२४ फलश्रुती | ३ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ८ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १० |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १४ |
| | समन्वय उपक्रम | १६ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २० |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २१ |
| | रमाई आवास योजना | २२ |
| | शबरी आवास योजना | २३ |
| | पारधी आवास योजना | २४ |
| | आदिम आवास योजना | २५ |
| | प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान | २५ |
| | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना | २६ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २६ |
| | मोदी आवास घरकुल योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/<br>यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |



डॉ. राजाराम दिघे
संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य

महा आवास त्रैमासिकाच्या माहे एप्रिल ते जून २०२४ या अंकाच्या माध्यमातून आपणाशी संवाद साधताना मला आनंद होत आहे. या अंकामध्ये मागील तीन महिन्यांमध्ये झालेल्या घडामोडींचा आढावा घेण्यात आलेला असून त्याचबरोबर माहे जून पर्यंतची सर्व योजनांची प्रगती, विभागनिहाय यशोगाथा, बैठका व नाविन्यपूर्ण उपक्रम यांचा सविस्तर आढावा या अंकामध्ये घेण्यात आला आहे. दिनांक २० नोव्हेंबर २०२३ ते ०५ जून २०२४ या दरम्यान महा आवास अभियान २०२३-२४ राबविण्यात आले. महा आवास अभियान १, २ व ३ च्या तुलनेत या अभियानात अनेक नव्या उपक्रमांना आपण चालना दिली असून त्यामध्ये आपणास यश मिळाले आहे.

महा आवास अभियान एक, दोन, अमृत महा आवास अभियान व महा आवास अभियान २०२३-२४ यांचा कालावधी एकत्रित केला तर जवळपास ३ वर्ष ६ महिने पेक्षा अधिक दिवस झाले आहेत. चारही अभियानामध्ये अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. यामध्ये पहिल्या अभियानात कोरोना जागतीक महामारी, तर दुसऱ्या अभियान काळामध्ये ग्रामपंचायत निवडणुक आचारसंहिता, अमृत महा आवास अभियानात भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून मंजूरी देणे, जॉब कार्ड, मिक्स ग्रामपंचायती, इत्यादी तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. तर चौथ्या अभियानामध्ये लोकसभा निवडणूक २०२४ आचारसंहितेमुळे या अभियानाच्या गतीला मर्यादा आल्याचे दिसून येत होते. परंतु राज्यातील विविध भागधारकांच्या सक्रिय सहभागामुळे चारही अभियान अधिक गतिमान करण्यात आपणास यश आले. राज्यातील विविध स्तरावरील अधिकारी/पदाधिकारी यांनी अभियानात आपला सक्रिय सहभाग नोंदविला. राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री (गृह), मा.उप मुख्यमंत्री (वित्त), मा. मंत्री ग्राम विकास व पंचायत राज, जिल्हयांचे मा.पालकमंत्री तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष व पंचायत समिती सभापती व ग्रामपंचायत सरपंच आणि सर्व सदस्य यांचाही अभियानात सक्रिय सहभाग विविध प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दिसून आला आहे.

महा आवास अभियान टप्पा १ व २, अमृत महा आवास अभियाना प्रमाणेच महा आवास अभियान २०२३-२४ मध्ये अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या अंमलबजावणी मुळे लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यामध्ये मदत होत आहे. महा आवास अभियान २०२३-२४ मधील राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे यश पुढील प्रमाणे सांगता येईल. पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, मोफत शासकीय जागा उपलब्ध करून देणे, अतिक्रमण नियमानुकूल करणे व इतर मार्गाने या विविध योजनांच्या माध्यमातून ८,९५६ लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच भूमिहीन लाभार्थ्यांच्या जागेची समस्या सोडविण्याठी ९८ बहुमजली इमारती, ३९ गृहसंकुले, ६ हाऊसिंग अपार्टमेंट व १,१२१ लँड बँकची निर्मिती करण्यात आली. राज्यपुरस्कृत आवास योजनांतील ५,२०,२४७ घरकुलांना मंजूरी, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील २,३०,७७८ तर राज्यपुरस्कृत आवास योजनेतील ७,३६,६५३ लाभार्थ्यांना पहिला, दुसरा व तिसऱ्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. यामुळे योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता येऊन प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील १,३२,१८६ तर राज्यपुरस्कृत आवास योजनांतील १,७१,२१८ अशा एकूण ३,०३,४०४ लाभार्थ्यांनी आपल्या पक्क्या घरात प्रवेश केला. लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम साहित्य वाजवी दरात व नजीकच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी २०० घरकुल मार्ट व वाळूची समस्या सोडविण्यासाठी ८१९ ठिकाणी सँड बँकची निर्मिती करण्यात आली. प्रलंबीत घरकुले पुर्ण करणेसाठी जनसुनावणी (लोक अदालत), पोलीसांचा वापर, इ. साधनांचा आपण उपयोग केल्यामुळे ही घरकुले पुर्ण होण्यास मदत मिळाली आहे. १,२०० ग्रामपंचायतीमध्ये सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. Area Officer App चा वापर व लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी इतर शासकीय योजनांशी कृतीसंगम करण्यात येतो. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील १.३६ लाख लाभार्थ्यांना शौचालये, १.२४ लाख लाभार्थ्यांना नळाद्वारे पाणीपुरवठा, १.२४ लाख लाभार्थ्यांना उज्वला गॅस, १.२८ लाख

लाभार्थ्यांना सौभाग्य योजनेतून वीज कनेक्शन, २.०३ लाख लाभार्थ्यांना उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करून देण्यासाठी बचत गटांमध्ये समावेश अशा बाबी करण्यात आल्या आहेत. राज्यामध्ये केंद्र योजनांबरोबरच राज्याच्या दलित वस्ती सुधार योजना,ठक्कर बाप्पा वस्ती सुधार योजना, जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील सेस फंड तसेच सीएसआर निधी याच्या माध्यमातून लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी जोड/अंतर्गत रस्ते, पथ दिवे, सांडपाणी व्यवस्था, इ. मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून राज्यात ७०,४४३ घरकुलांची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच घरकुल बांधकामामध्ये फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/ परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करून राज्यात १९,२६४ मॉडेल हाऊसेसची उभारणी करण्यात आली आहे. क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर करून राज्यात ८,७६७ घरकुले बांधण्यात आली.

असे असले तरी राज्यपुरस्कृत आवास योजनेतील १,३८,५७३ घरकुलांना मंजूरी देणे व प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधील १,२१,५२४, व राज्यपुरस्कृत आवास योजनांमधील ५,४७,५११ असे एकूण ६,७६,०१० घरकुले विहित वेळेत पुर्ण करण्याचे आव्हान आहे. यामध्ये सर्वाधिक अपुर्ण घरकुले मोदी आवास घरकुल योजना, रमाई आवास योजना व शबरी आवास योजनांतील आहेत. या लाभार्थ्यांचेही आपले पक्क्या घराचे स्वप्न लवकर पुर्ण होईल, यादृष्टीने आपण प्रयत्नशील आहात याची खात्री आहे.

ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२४-२५ साठी अंदाजे ५.४० लाख नवीन उद्दिष्ट राज्यास प्राप्त होणार आहे. त्यासाठी सर्व जिल्ह्यांनी आपल्या कामाची गती वाढवून सध्याची अपूर्ण घरकुले पूर्ण करावीत. केंद्र सरकारने अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ ही अखेरची मुदत दिली असून अपूर्ण घरकुलांची विगतवारी आवास सॉफ्ट प्रणालीवर पुढील तीन Category मध्ये वर्गीकरण करण्याच्या सुचना दिल्या आहेत. A Category - जी घरकुले आर्थिक व भौतिकदृष्टया दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी पर्यंत होऊ शकतील अशी घरकुले, B Category - जी घरकुले भौतिकदृष्टया पूर्ण होऊ शकत नाही, पण अशा घरकुलांना वितरीत केलेल्या हप्त्याची वसुली दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत करणे शक्य आहे अशी घरकुले, C Category - कायम स्वरुपी स्थलांतर, कायदेशीर वारस नसलेल्या लाभार्थ्यांचा मृत्यु आणि इतर कारणांमुळे घरकुले पूर्ण होऊ शकत नाही आणि घरकुलांना वितरीत केलेली हप्त्याची रक्कमेची वसुली होऊ शकत नाही अशी घरकुले.

तसेच प्रधानमंत्री—जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM- JANMAN) अंतर्गत उर्वरित १३,१६२ घरकुलांचे सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या, तसेच उर्वरित मंजूरी, प्रथम हप्ता वितरण व मंजूरी दिलेली घरकुले तात्काळ पूर्ण करण्याबाबत सूचना मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी दिल्या असल्यामुळे हे काम आपणास विहित मुदतीत पुर्ण करणे आवश्यक आहे.

प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत भूमीहीन लाभार्थ्यांसाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी पंडित दीनदयाळ जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत अनुदान रक्कम रु. ५०,०००/- ऐवजी रु. १,००,०००/- करण्यात आल्याने या योजनेचा प्रभावी उपयोग करून घ्यावा. ज्या जिल्ह्यांमध्ये भूमिहिन लाभार्थी संख्या जास्त आहे, अशा जिल्हयांनी अनुदान रक्कम रुपये एक लाखचा लाभ लाभार्थ्यांना मिळेल असे बघावे. जेणेकरुन लाभार्थ्यांना घरकुल बांधणे सोयीचे होईल.

मा.मंत्री ग्रामविकास व पंचायत राज, विविध जिल्ह्यांचे मा.पालकमंत्री, पदाधिकारी , अधिकारी, केंद्रीय अधिकारी यांचे दौरे, घरकुल भेटी याचेही सविस्तर विवेचन सदर अंकामध्ये करण्यात आले आहे. तसेच राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत योजनांना गतिमानता देण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमांचे वृत्तांकन सदर अंकामध्ये करण्यात आले असून मागील तीन महिन्यांचा योजनांनिहाय प्रगती अहवालाचाही समावेश करण्यात आला आहे. सहा विभागाच्या यशोगाथा यामध्ये नागपूर विभागातील भंडारा, अमरावती विभागातील अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी, छत्रपती संभाजीनगर विभागातील जालना जिल्ह्यातील भोकरदन, नाशिक विभागातील नाशिक जिल्ह्यातील निफाड, पुणे विभागातील सातारा आणि कोंकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी तालुक्यातील यशोगाथा वाचनीय आहेत.

महा आवास अभियानातील ग्रामपंचायत, तालुका, जिल्हा व विभागस्तरावरील पुरस्काराचे वितरण वेळेत पुर्ण करावे ही अपेक्षा. मागील अंकाप्रमाणे हा अंकही आपणास नक्कीच आवडेल, या अपेक्षेसह व अनेक शुभेच्छांसह!

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, ग्रामीण गृहनिर्माण,**
**महाराष्ट्र राज्य**

# महा आवास अभियान २०२३-२४ फलश्रुती

**"सर्वांसाठी घरे-२०२४"** हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना तसेच त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमण नियमानुकूल करणे अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत.

या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे या हेतूने महाराष्ट्र राज्यात **दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४"** राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले, मा. सचिव, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना श्री. के. टी. पाटील व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न झाला. या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेला सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, महा आवास अभियान २०२१-२२ पुरस्कार विजेते, ग्राम विकास व पंचायत राज विभाग व राज्य व्यवस्थापन कक्षातील सर्व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. पावसाळ्यापूर्वी लाभार्थ्यांना घरकुल देण्यासाठी मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज यांच्या मान्यतेने मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी या अभियानाला दिनांक ०५ जून, २०२४ पर्यंतची मुदतवाढीची घोषणा केली. त्यानुसार **दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ०५ जून, २०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४"** राबविण्यात आले.

**दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक** ०५ जून, **२०२४ या कालावधीत "महा आवास अभियान २०२३-२४"** अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची फलश्रुती पुढीलप्रमाणे आहे.

## i.भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे

ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना,** शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग- उदा. बक्षीसपत्र, संमतीपत्र, भाडेपट्टा, इ. प्रभावीपणे राबवून ८,९५६ भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता केली आहे.

तसेच राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायत क्षेत्रात नागरीकरणामुळे जागा उपलब्ध होत नाही. ग्रामीण भागात सद्यस्थितीत जागांच्या किंमती पाहता, प्रत्यक्षात जागा खरेदी करण्यासाठी उपलब्ध होणारी रक्कम रु.५०,०००/- मध्ये ५०० चौ. फु. जागा खरेदी करणे देखील शक्य होत नाही. सदरची वस्तुस्थिती विचारात घेवून पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत भूमिहीन पात्र लाभार्थ्यांना घरकुल जागा खरेदीसाठी सध्याची रक्कम रु. ५०,०००/- यात वाढ करुन प्रति लाभार्थी रु. १,००,०००/- इतकी करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.





### ii.घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टांनुसार घरकुलांना १०० टक्के मंजूरी देणे या उपक्रमाच्या माध्यमातून अभियानात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत एकुण ५,२०,२४७ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी लाभार्थी मेळावे, लाभार्थ्यांना **घरकुल मंजूरीचे पत्र** वितरण, भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करुन घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करून **बांधकाम सुरु करण्यात आले**.



### iii.मंजूर घरकुलांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत २,३०,७७८ व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत ७,३६,६५३ अशा एकुण ९,६७,४३१ मंजूर घरकुलांना **पहिला, दुसरा व तिसऱ्या हप्त्याचे वितरण** घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार विनाविलंब वितरीत केले. लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी स्थानिक स्तरावर **हप्ते वितरण कार्यक्रमाचे आयोजन** करण्यात आले.



### iv.सर्व मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १,३२,१८६ व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत १,७१,२१८ अशा एकुण ३,०३,४०४ मंजूर घरकुलांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण केले आहे. लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी त्यांच्या बैठका/मेळावे घेण्यात आले. तसेच सरपंच, ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, महिला स्वयंसहाय्यता गट, अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, इ. यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी देवून मंजूर घरकुले किमान कालावधीत,दर्जेदार व गतीने पूर्ण करण्यासाठी विशेष कामगिरी बजावली आहे.



### v.प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे

प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण करुन त्यावर उपाययोजना करून २६,६६६ घरकुले पूर्ण करण्यात आली.**

याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने '**लोक अदालत**' वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त केले. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand केली. तसेच **यापुढे**



**प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नवीन घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घेण्याचे सुचित केले.**

## vi.ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ३,४४२ ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट हे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण केले. तसेच **९,९९४ मुल्यांकन**(Assessment) **पूर्ण करुन** माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रलंबित घरकुले (Deleayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचा उपयोग करून घरकुले पूर्ण केली. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल तयार करून या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेण्यात येत आहे.**



## vii.बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे

जागांची कमतरता व जागांच्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करून, प्रवृत्त करून एकत्र आणून व त्यांच्या एकत्रित निधीतून जागा खरेदी करून त्याद्वारे त्यांच्या बहुमजली इमारती, गृहसंकुले व अपार्टमेंट द्वारे घरांचे स्वप्न पूर्ण केले. अशा लाभार्थ्यांच्या राज्यात **प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये** प्रत्येकी किमान एक याप्रमाणे ९८ **बहुमजली इमारती** (G + 1 ते 4), **३९ गृहसंकुले व ६ हाऊसिंग अपार्टमेंट** उभारण्यात आल्या आहेत.



## डेमो हाऊसचा प्रभावी वापर करणे

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत तालुका व जिल्हा स्तरावर एकुण ३५८डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली आहे. लाभार्थ्यांना मार्गदर्शनासाठी या डेमो हाऊसेसला २,०६,५१८ लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटीचे आयोजन केले आहे. तसेच ग्रामपंचायत स्तरावरील डेमो हाऊस मॉडेल लाभार्थ्यांस वेळोवेळी दाखवून त्याप्रमाणे त्यांच्या घरकुलांची कामे होण्यासाठी त्यांचा प्रभावी वापर होत आहे. या व्यतिरिक्त प्रत्येक डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ग्रामसंघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून १७७ कॉप-शॉप (Co-op Shop) सुरु करण्यात आले.



## ix.शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence)

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करून ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून ५४.६९ लक्ष** मनुष्य दिवस रोजगार, **स्वच्छ भारत मिशन (ग्रा) मधून १.३६ लक्ष शौचालये, जल जीवन मिशन मधून १.२४ घरांना** नळाने पिण्याच्या पाण्याचा



पुरवठा, **प्रधानमंत्री उज्वला योजनेमधून १.२४ लक्ष** गॅस जोडणी, **सौभाग्य योजनेमधून १.२८ लक्ष** विद्युत जोडणी, **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशनमधून २.०३ लक्ष** उपजिविका साधनांची उपलब्ध**ता, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) मधून** उर्जेच्या बचतीसाठी **साधने** तसेच **दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी** इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांची घरकुले, बहुमजली इमारती, गृहसंकुले, हाऊसिंग अपार्टमेंट यांना ७०,४४३ **मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे,** इ. उपलब्ध करुन देण्यात आल्या आहे.



## x.नावीन्यपूर्ण उपक्रम (Innovations / Best Practices) राबविणे

ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम

**१. लॅण्ड बँक :-** सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची **१,१२१ 'लॅण्ड बँक'** तयार करण्यात आली.

**२. सॅण्ड बँक :-** सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे ८१९ **'सॅण्ड बँक'** ची निर्मिती करण्यात आली.



**३. घरकुल मार्ट :-** राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे २०० **घरकुल मार्ट** सुरू करून त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. विक्रीसाठी उपलब्ध केले.




**४.गृहकर्ज :-** घरकुलांचे बांधकाम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी वित्तीय संस्थांच्या समन्वयातून गरजेप्रमाणे इच्छुक ७६ लाभार्थ्यांना **गृहकर्ज** मिळवून देण्यात आले.

**५.वाळूला पर्याय :-** क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इ.साहित्याचा वापर **वाळूला पर्याय** म्हणून वापर करून ८,७६७ घरकुले बांधण्यात आली.

**६.मॉडेल हाऊसेस :-** घरकुल बांधकामामध्ये फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करून **१९,२६४ मॉडेल हाऊसेस** उभारली असून रंगरंगोटी करतांना घरकुलांना आकर्षक रंगसंगती केली.

**७.नवनवीन तंत्रज्ञान :-** घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, किफायतशीर बांधकाम व नैसर्गिक आपत्तीरोधक तंत्रज्ञान, इत्यादी १,००,८९६ **नवनवीन तंत्रज्ञानाचा** वापर केला आहे.

**८.पथदर्शी प्रकल्प :-** सिडको (City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited) सारख्या शहरी गृहनिर्माण करणाऱ्या संस्थांच्या मदतीने **पथदर्शी प्रकल्प** म्हणून १,०५५ Precast Technology घरे तयार करण्यात आली आहे.



९.५६,०४३ घरांवर ग्रामीण गृहनिर्माण **योजनेचा** लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही **मध्ये घरकुलाची नोंद** इ. बाबींची पूर्तता करण्यात आली.

**१०.क्षेत्र अधिकारी ॲप :-** ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी **क्षेत्र अधिकारी ॲप** (Area Officer App) ची निर्मिती केली आहे. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पाहणी करतांना ७८ अधिकाऱ्यांनी या ॲपचा वापर केला.

## अभियानाच्या अंमलबजावणीसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम

"**महा आवास अभियान २०२३-२४**" च्या प्रभावी अंमलबजावणी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्यस्तरीय अभियान शुभारंभ कार्यशाळेसह राज्यात **विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा व ग्रामस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळांमध्ये अभियाना विषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे या कार्यशाळांच्या माध्यमातून अभियान यशस्वीतेसाठी उपाययोजना व नियोजन करण्यात आले.**

## ग्राम कृती गटाचे (Village Action Group) गठन

या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये 'ग्राम कृती गटाचे गठन' करण्यात येत आहे. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/युवती, इत्यादींचा समावेश करत आहे. उदा. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस इ. प्रभावी व्यक्ती. या गटाने "**महा आवास अभियान २०२३-२४**" मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियान १०० टक्के यशस्वी करण्यात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

## लाभार्थी मेळावे

गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे, तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करणे, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम करणे, गृहप्रवेश कार्यक्रम करणे, इ. सारखे उपक्रम राबविणेत आलेत.

## बँक मेळावे

तालुकास्तरावर/ गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात आले.

## अभियानाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम

'महा आवास अभियान २०२३-२४' अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांबाबत जन जागृती, प्रचार-प्रसिध्दी करण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) च्या विविध उपक्रमांचा जसे- Mass मिडीया, Outdoor मिडीया, Social मिडीया, Group मिडीया, आंतरव्यक्ती संवाद (IPC), पारंपारिक मिडीया, इ. उपक्रमांचा यथोचित वापर करण्यात आला.

## अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन

'**महा आवास अभियान २०२३-२४**' च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर समित्या कार्यरत राहतील. या सर्व स्तरावरील अंमलबजावणी,संनियंत्रण व मूल्यमापन समित्या राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरुन क्षमता बांधणी कार्यशाळा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी (Field Visits), Awaas Soft, MIS Formats, इ. द्वारे अभियानाचे संनियंत्रण व मूल्यमापन करण्यात आले.

## अभियान कालावधीतील उत्कृष्ट कार्याचा गौरव

**महा आवास अभियान १ व महा आवास अभियान २ प्रमाणे 'महा आवास अभियान २०२३-२४'** मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना '**महा आवास अभियान पुरस्कार २०२३-२४**' देऊन गौरविण्यात येईल. अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावर उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने काढण्याचे काम प्रगतीत आहे.






## दिव्यांगाना स्वावलंबी आणि सक्षम बनविण्यासाठी घरे उपलब्ध करून देणार

### - मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. एकनाथ शिंदे

मा.उप मुख्यमंत्री (वित्त), श्री.अजित पवार यांनी सादर केलेल्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा अर्थसंकल्पाबाबत दिनांक २७ जून, २०२४ रोजी मा.उप मुख्यमंत्री (गृह), श्री.देवेंद्र फडणवीस, मा.उप मुख्यमंत्री (वित्त), श्री.अजित पवार व मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री.गिरीष महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत अर्थसंकल्पात घेण्यात आलेल्या महत्वाच्या निर्णयांबाबत मा.मुख्यमंत्री, श्री.एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेवून माहिती दिली.

राज्याचा अर्थसंकल्प खऱ्या अर्थाने महिला, युवक, शेतकरी यांचा सन्मान करून त्यांना मोठे बळ देणारा आहे. १ लाख कोटींच्या योजनांचा समावेश असलेला हा क्रांतिकारी अर्थसंकल्प दुर्बल, गोरगरीब, शेतकरी आणि युवकांचे भविष्य उज्वल करणारा व महाराष्ट्राला नवी दिशा देणारा हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया मा.मुख्यमंत्री महोदयांनी व्यक्त केली.

धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना ही महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केली असून याद्वारे राज्यातील सर्व दिव्यांगांसाठी राज्य शासनामार्फत पहिल्या टप्प्यात ३४ हजार ४०० घरे बांधण्यात येणार आहेत. धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन सर्व पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्व मूलभूत नागरी सुविधांसह घरे उपलब्ध करून देण्यात देईल. ज्यामुळे दिव्यांगांना स्वावलंबी आणि सक्षम होईल. असे मा.मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले.

दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या शारीरिक किंवा मानसिक दुर्बलतेमुळे स्थिर रोजगार मिळवता येत नाही. त्यामुळे ते स्वतःचे घर बांधू शकत नाहीत. अशा व्यक्तींचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना राबविणार असल्याचे मा.मुख्यमंत्री, श्री.एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून १० लक्ष लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होणार

### - मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन

राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी दिनांक २० नोव्हेंबर रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनांचे औचित्य साधून राज्यात दरवर्षी " महा आवास अभियान" राबविण्यात येते.



गेल्यावर्षी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यात "अमृत महा आवास अभियान २०२२-२३" राबविण्यात आले. या अभियानाचा शुभारंभ राज्याचे मा.मुख्यमंत्री, श्री.एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते मा.उप मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस, मा. अध्यक्ष, विधानसभा, ॲड. राहुल नार्वेकर, मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार, मा. संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. सन २०२२-२३ मध्ये राबविण्यात आलेल्या अभियानाचे यश लक्षात घेता यावर्षी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. एकनाथ डवले व मा. संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत " महा आवास अभियान २०२३-२४" चा शुभारंभ करण्यात आला. या दोन्ही अभियानाच्या शुभारंभा प्रसंगी महा आवास अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना राज्यस्तरीय "महा आवास अभियान पुरस्कार" व "महा आवास अभियान विशेष पुरस्कार " स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले असल्याचे मा.मंत्री महोदयांनी सांगितले.

दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ०५ जून, २०२४ या अभियान कालावधीत विविध उपक्रमांची अंमलबजावणी करून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ४,३५,१५८ घरकुले, राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांतर्गत २,०३,७४३ घरकुले व नव्याने सुरू करण्यात आलेल्या मोदी आवास घरकुल योजनेंतर्गत ३४,९०३ घरकुले अशी एकुण ६,७४,६५७ घरकुले पूर्ण करण्यात आली आहेत. या वर्षात १० लाख लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पुर्ण करण्याचा मानस असल्याचे मा.मंत्री महोदयांनी सांगितले.

# ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांच्या राज्यस्तरीय बैठका

राज्यात राबविण्यात आलेल्या महा आवास अभियानामुळे ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात आलेली गतिमानता व गुणवत्ता यामध्ये सातत्य कायम ठेवण्यासाठी संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी माहे एप्रिल ते जुन २०२४ या कालावधीत राज्यातील सर्व भागधारकांच्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व्दारे नियमित बैठका घेवून घरकुल योजनांच्या कामांचा आढावा घेतेला. तसेच त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले.

या बैठकांना विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), सहाय्यक आयुक्त (विकास), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विभागीय प्रोग्रामर, जिल्हास्तरीय प्रोग्रामर, डेटा एन्ट्री ऑपरेटर व संबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकांमध्ये तालुक्यातील मनरेगा ऑपरेटर व घरकुल योजनेचा ऑपरेटर यांच्यामध्ये समन्वय ठेवून लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते वेळेत वितरीत करणे, ग्रामसेवक/लाभार्थी/ग्रामीण गृहनिर्माण अभियंते यांच्या कडून प्रस्ताव/कागदपत्र वेळेत उपलब्ध करणे, घरकुलांना विनाविलंब मंजूरी देणे, भौतिकदृष्टया पुर्ण असलेली घरकुलांना शेवटचा हप्ता वितरीत करणे, भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, अपुर्ण घरकुले पूर्ण करणे, घरकुले आर्थिक व भौतिकदृष्ट्या विहित वेळेत पूर्ण होणेसाठी सातत्याने पाठपुरावा करणे, प्रलंबीत घरकुले (Delayed Houses) लोक अदालत किंवा इतर मार्गाने पूर्ण करणे, अपात्र लाभार्थ्यांची रिमांड प्रक्रिया पूर्ण करणे, विविध योजनांच्या कृतीसंगमाचा लाभ घरकुल लाभार्थ्यांना देणे, जागेचा वाद, करारनामा अप्राप्त, मयत लाभार्थी, अकाउंट व्हेरिफिकेशन, राज्य योजनेतील बदली प्रस्ताव याबाबत ग्रामपंचायतनिहाय संपर्क अधिकारी नेमून लाभार्थी निहाय पडताळणी करणे, इ. बाबतची कार्यवाही करण्याच्या सूचना संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी दिल्या.

तसेच डेमो हाऊस मध्ये कॉप-शॉप सुरू करणे, घरकुल मार्ट सुरू करणे, सॅण्ड बँक उभारणी, लॅण्ड बँक उभारणी, मॉडेल हाऊसेसची निर्मिती यासह अमृत महा आवास अभियान पुरस्कार वितरण करणे व शासकीय जमीनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करणे अशा सूचना डॉ. राजाराम दिघे यांनी या बैठकांमध्ये केल्या.



# सोलापूर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून गवंडी प्रशिक्षणाच्या कामाची तपासणी

**राज्यात** घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व कुशल गवंड्याची निर्मिती करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण ग्रामस्तरावर देण्याकरीता प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाची नेमणूक करण्यात आली असून या संस्थाशी समन्वय ठेवून प्रशिक्षण पूर्ण करण्यात येत आहे. तसेच **त्यांचे मुल्यांकनही** (Assessment) **त्वरीत पूर्ण करुन** सदर माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत करण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रलंबित घरकुले (Deleayed Houses) प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचा उपयोग करून घरकुले पूर्ण करण्यात येत आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील पंचायत समिती दक्षिण सोलापूर अंतर्गत ग्रामपंचायत अंत्रोळी येथे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या माध्यमातून गृहसंकुलाचे बांधकाम प्रगतीत असून यामध्ये १८ लाभार्थी सहभागी आहेत.

दिनांक १७ मे, २०२४ रोजी या गृहसंकुलाच्या बांधकामास सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मनीषा आव्हाळे व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. सुधीर ठोंबरे यांनी भेट देवून कामाची तपासणी केली व उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी गट विकास अधिकारी श्री.अजित देसाई, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली बैठका

राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी मा. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या उपस्थितीत दिनांक ०८ मे, २०२४ व दिनांक १३ जुन २०२४ रोजी सर्व विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास), जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांच्या आढावा बैठका संपन्न झाल्या.

या बैठकांमध्ये संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीबाबत सादरीकरण केले. तसेच या बैठकांमध्ये सर्व आवास योजनांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार ग्रामीण विकास मंत्रालय,भारत सरकार यांच्या निर्देशानुसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सन २०२४-२५ साठी अंदाजे ५.५० लाख नवीन उद्दिष्ट राज्यास प्राप्त होणार असल्याने सर्व जिल्ह्यांनी आपल्या कामाची गती वाढवून अपूर्ण घरकुले पूर्ण करावी, भूमीहीन लाभार्थ्यांसाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत अनुदान रक्कम रु. १ लक्ष केली असून या योजनेचा प्रभावी उपयोग करावा, प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM- JANMAN) अंतर्गत उर्वरित सर्वेक्षण पूर्ण करून उर्वरित मंजूरी, सर्व हप्ते वितरण व घरकुले तात्काळ पूर्ण करावे, राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सर्व जिल्हयांनी तात्काळ मंजूरीची प्रक्रिया पूर्ण करावी व मंजूरी दिलेली घरकुले वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन करावे, अशा सूचना मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांनी दिल्या.



## प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या उद्दिष्टपूर्तीसाठी केंद्र सरकारच्या बैठका

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण, मूल्यमापन व उद्दिष्टपूर्तीसाठी माहे एप्रिल ते जुन २०२४ या कालावधीत ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील अधिकाऱ्यांनी सर्व राज्यांच्या नियमित बैठका घेतल्या. या बैठकांना महाराष्ट्र राज्यातून संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकांमध्ये राज्यास प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत देण्यात आलेल्या उद्दिष्टपूर्तीचा आढावा घेण्यात आला. तसेच उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याने केलेल्या उपाययोजना व सद्यस्थितीत सुरू असलेल्या कार्यवाही बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे उर्वरीत उद्दिष्टपूर्तीचे नियोजन राज्याकडून घेण्यात आले. आवास सॉफ्ट प्रणाली मधील बदलांबाबत केंद्रिय अधिकारी यांचेकडून मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे उद्दिष्टपूर्तीसाठी राज्यात महा आवास अभियान व विविध नावीन्यपूर्ण उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत असून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अपुर्ण घरकुले पूर्ण करणेसाठी विभागनिहाय विशेष मोहिम राबविण्यात येत आहेत. यामुळे राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आली असल्याचे संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.

भुमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेच्या उपलब्धतेसाठी राज्यात टास्क फोर्स समितीची स्थापना, ग्रामस्तरावर उपलब्ध जागेतून लॅण्ड बँकची निर्मिती, बहुमजली इमारती, हाऊसिंग अपार्टमेंट व गृहसंकुलाची उभारणी करण्यात येत असून त्यासोबतच पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत अनुदान रक्कम रू. ५० हजाराहून रु. १ लक्ष केल्यामुळे भुमिहीन लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होत असून यामुळे घरकुल बांधकामास गती मिळत असल्याचे डॉ. राजाराम दिघे यांनी सांगितले.



# सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी विशेष मोहिम

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत अपूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करण्यासाठी दिनांक २७ मे, २०२४ ते दिनांक ३१ मे, २०२४ या कालावधीत राज्यस्तरीय संपर्क अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली विभागस्तरीय व जिल्हास्तरीय प्रोग्रामर यांच्या उपस्थितीत संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाच्या ठिकाणी राज्यस्तरावरून विशेष मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमेकरीता राज्यस्तरावरून नागपूर येथे नागपूर विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून उपसंचालक श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे व वास्तुविशारद श्री.परमेश्वर शेलार उपस्थित होते.



अमरावती येथे अमरावती विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून उपसंचालक श्री.नीलेश काळे व राज्य समन्वयक श्री.संघपाल चव्हाण उपस्थित होते.




छत्रपती संभाजी नगर येथे छत्रपती संभाजी नगर विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून राज्य समन्वयक (IT) श्री.राम आघाव व विस्तार अधिकारी श्री.संतोष ठोंबरे उपस्थित होते.



नाशिक येथे नाशिक विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून राज्य समन्वयक (MIS) श्री.मायकल एल्डन व प्रशिक्षण समन्वयक श्री.मधुकर वाघ उपस्थित होते.



पुणे येथे पुणे व कोकण विभागाकरीता संपर्क अधिकारी म्हणून राज्य समन्वयक (M&E) डॉ.संघरत्न सोनवणे उपस्थित होते.



यासोबतच विभाग व जिल्हा प्रोग्रॅमर नेमून दिलेल्या विभागाच्या ठिकाणी उपस्थित होते. या मोहिमे अंतर्गत जी घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण आहेत, परंतु त्यांचे फोटो घेतले नाहीत, ते फोटो आवास सॉफ्ट प्रणालीवर अपलोड केलेले नाहीत व तालुकास्तरावरुन approve केलेले नाहीत, अशी घरकुले online पूर्ण करुन घेण्यात आली. Plinth व Lintel Level वरील घरकुलांना दुसरा व तिसरा हप्ता वितरीत करून घरकुल Physically पूर्ण करण्यात आली. Delayed Houses मधील घरकुले पूर्ण करण्यात आली. आधार सिडींग व आधार Authentication व आधार Verification पूर्ण करण्यात आले.

या मोहिमेदरम्यान ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर व तालुकास्तरीय नोडल अधिकारी हे त्यांना नेमून दिलेल्या आपल्या कार्यक्षेत्रात उपस्थित होते. जिल्हास्तरावर या मोहिमेचे संनियंत्रण व मूल्यमापन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांचेमार्फत आढावा बैठका व क्षेत्रीय भेटींच्या माध्यमातून करण्यात आले. या मोहिमेमुळे घरकुल बांधकाम व हप्ते वितरण प्रक्रिया जलद व प्रभावीपणे झाली.

# राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून अमृत महा आवास अभियानांतर्गत पूर्ण झालेल्या बहुमजली इमारती, गृहसंकुले व बहुमजली गृहसंकुलांची तपासणी

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी दिनांक २० नोव्हेंबर रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनांचे औचित्य साधून राज्यात दरवर्षी **"महा आवास अभियान"** राबविण्यात येते. गेल्यावर्षी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ ते ०५ जुन, २०२३ या कालावधीत राज्यात **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** राबविण्यात आले. त्याचप्रमाणे यावर्षीही " महा आवास अभियान २०२३-२४" राबविण्यात आले. या दोन्ही अभियानाच्या शुभारंभ कार्यशाळेप्रसंगी महा आवास अभियान-२०२०-२१ व महा आवास अभियान २०२१-२२ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना राज्यस्तरीय "महा आवास अभियान पुरस्कार" व "महा आवास अभियान विशेष पुरस्कार" स्वरूप प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्हे देवून गौरविण्यात आले.

त्याचप्रमाणे **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** या अभियान कालावधीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्ती यांना राज्यस्तरीय अमृत महा आवास अभियान देवून गौरविण्याचे नियोजित आहे. त्यानुषंगाने विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीकडून राज्यस्तरीय समितीकडे प्राप्त झालेल्या मुल्यांकन अहवालानुसार बहुमजली इमारती, गृहसंकुले व बहुमजली गृहसंकुलांची तपासणी करण्याकरीता राज्यस्तरावरून दिनांक २७ मे, २०२४ ते दिनांक ३१ मे, २०२४ व दिनांक ५ ते ७ जून, २०२४ या कालावधीत राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नागपूर, पुणे व छत्रपती संभाजी नगर विभागातील बहुमजली इमारती, गृहसंकुले व बहुमजली गृहसंकुलांची तपासणी वास्तुविशारद श्री.परमेश्वर शेलार यांनी केली.

त्याचप्रमाणे छत्रपती संभाजी नगर विभागातील



बहुमजली इमारती, गृहसंकुले व बहुमजली गृहसंकुलांची तपासणी राज्य समन्वयक (IT) श्री.राम आघाव व विस्तार अधिकारी श्री.संतोष ठोंबरे यांनी केली.

नाशिक विभागातील बहुमजली इमारती,



गृहसंकुले व बहुमजली गृहसंकुलांची तपासणी प्रशिक्षण समन्वयक श्री.मधुकर वाघ यांनी केली.

पुणे जिल्ह्यातील बहुमजली इमारती, गृहसंकुले



व बहुमजली गृहसंकुलांची राज्य समन्वयक (M&E) डॉ.संघरत्न सोनवणे यांनी केली.

राज्यस्तरीय अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय भेटी देवून



तपासणी केलेल्या बहुमजली इमारती, गृहसंकुले व बहुमजली गृहसंकुलांचे मुल्यांकन करून राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती मार्फत पुरस्कार नामांकन निवड अंतिम करण्यात येईल.

## अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, सांगली यांच्या क्षेत्रीय भेटी

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांची कामे जलद गतीने पूर्ण करण्यासाठी सर्व जिल्हे विशेष प्रयत्न करीत आहेत. याकरीता सांगली जिल्ह्यांमध्ये दिनांक ०४ एप्रिल, २०२४ रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती तृप्ती घोडमिसे यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शशिकांत शिंदे यांच्या समवेत पंचायत समिती शिराळा अंतर्गत गावांना क्षेत्रीय भेटी देवून घरकुलांची पाहणी व घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिराळा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.संतोष राऊत, विस्तार अधिकारी, ग्रामसेवक व लाभार्थी उपस्थित होते.

या दौरा कार्यक्रमा दरम्यान श्रीमती तृप्ती घोडमिसे यांनी पंचायत समिती स्तरावर सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला. तसेच अपूर्ण घरकुले जलद गतीने पूर्ण करणे, सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे, गृहभेटी देवून लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासबंधी मार्गदर्शन करणे, मोदी आवास घरकुल योजना, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर सर्व आवास योजनांतर्गत घरकुलांची कामे तात्काळ सुरू करण्यासाठी ग्रामसेवक, लाभार्थी व संबंधितांच्या नियमित बैठका घेण्याच्या सूचना श्रीमती तृप्ती घोडमिसे यांनी पंचायत समिती स्तरावरील यंत्रणेला दिल्या.



## पुणे जिल्ह्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रकल्प संचालकांचे दौरे

केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती शालिनी कडू यांनी जिल्ह्यातील तालुके व ग्रामपंचायतींना भेटी देवून विविध आवास योजनांच्या कामांच्या आढावा बैठका, घरकुलांची तपासणी, घरकुल लाभार्थ्यांना मार्गदर्शन, लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम उपलब्धतेसाठी घरकुल मार्ट सुरू तसेच भूमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता या विषयी मार्गदर्शन केले.

यामध्ये दिनांक ०५ एप्रिल, २०२४ रोजी पंचायत समिती मावळ, दिनांक १६ एप्रिल, २०२४ रोजी पंचायत समिती पुरंदर, दिनांक २३ एप्रिल, २०२४ रोजी पंचायत समिती वेल्हे, दिनांक २५ एप्रिल, २०२४ रोजी पंचायत समिती बारामती व दिनांक २६ एप्रिल, २०२४ रोजी पंचायत समिती इंदापूर येथे श्रीमती शालिनी कडू यांनी गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, संबंधित अधिकारी/कर्मचारी व ग्रामसेवक यांच्या केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या आढावा बैठका घेतल्या. तसेच सबंधित पंचायत समिती अंतर्गत गावांना क्षेत्रीय भेटी देवून घरकुलांची तपासणी व लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले.




## गवंडी प्रशिणातून घरकुले पूर्णतेसाठी मानवतच्या गट विकास अधिकाऱ्यांचा पुढाकार

दिनांक १५ मे, २०२४ रोजी परभणी जिल्ह्यातील हमदापुर तालुक्यांतर्गत हमदापुर गावातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणातील प्रलंबित असलेली घरकुलांची बांधकामे त्वरीत सुरू करण्यासाठी पंचायत समिती मानवतचे गट विकास अधिकारी श्री.विष्णू मोरे यांनी संबंधित लाभार्थ्यांची भेट घेवून त्यांना घरकुलांचे बांधकाम तात्काळ सुरू करण्यासाठी मार्गदर्शन केले.

यावेळी शाखा अभियंता श्री.एस.एस.वसेकर, विस्तार अधिकारी श्री.शिंदे, श्री.अशोक यशवदे, डेटा एन्ट्री ऑपरेटर, सरपंच, लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळा तालुक्यात घरकुल बांधकामासाठी भुमीपूजन

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.घोलप यांच्या संकल्पनेतून मंजुर घरकुल बांधकाम तात्काळ सुरू करण्यासाठी शिरोळ तालुक्यातील विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थ्यांचा घरकुल भूमिपूजन कार्यक्रम दिनांक १३ व १४ जून २०२४ रोजी तालुक्याचे मा.आमदार श्री.राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

या कार्यक्रमाकरीता प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली. या नोडल अधिकाऱ्याने लाभार्थ्यांना ग्रामीण गृहनिर्माण योजनेसंबंधित सर्व माहिती देऊन घरकुल बांधकामास त्वरीत सुरू करून स्वतःच्या पक्क्या घरात राहायला जाण्यासाठी प्रोत्साहित केले. यामुळे शिरोळा तालुक्यांतर्गत ८२ लाभार्थ्यांच्या घरकुलांचा भूमीपूजन कार्यक्रम पार पडला

या कार्यक्रमाप्रसंगी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.घोलप, सहाय्यक गट विकास अधिकारी श्री.रवी कांबळे, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामपंचायतीचे सरपंच, सदस्य, ग्रामसेवक, लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.



## विभागीय आयुक्त पुणे यांचेकडून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या घरकुलांना भेटी

दिनांक ०७ मे, २०२४ रोजी पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी पुणे जिल्ह्यातील पंचायत समिती मावळ येथे भेट दिली. या भेटी दरम्यान त्यांनी विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच त्यांनी मावळ तालुक्यातील जांभूळ गावातील विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत पूर्ण झालेल्या घरकुलांना भेटी दिल्या. घरकुलांच्या कामाची गुणवत्ता व विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून लाभार्थ्यांना मिळालेला लाभ याबद्दल डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी सर्व यंत्रणेचे कौतुक केले. यासारखे उत्कृष्ट कामे संपूर्ण विभागात होत असून याकामी आपली सर्व यंत्रणा सक्रिय सहभागी असल्याचेही यावेळी विभागीय आयुक्तांनी सांगितले.

याप्रसंगी पुणे जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.संतोष पाटील, प्रकल्प संचालक श्रीमती शालिनी कडू, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती मावळचे गट विकास अधिकारी व इतर अधिकारी उपस्थित होते.





## सातारा जिल्ह्यात घरकुल लाभार्थ्यांना शासकीय जागा उपलब्धतेसाठी यंत्रणेचा गौरव

दिनांक २८ जून, २०२४ रोजी सातारा जिल्ह्यातील सातारा, कोरेगाव, फलटण या तालुक्यातील विविध ग्रामीण आवास योजनांतर्गत भुमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देणारे संबंधित तालुक्याचे उप विभागीय अधिकारी व तहसीलदार यांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते व जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.



## ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीसाठी यशोगाथांचे चित्रीकरण व लघुपट निर्मिती

राज्यात सन २०२०-२१ ते आजपर्यंत राबविण्यात आलेल्या महा आवास अभियानाच्या माध्यमातून लाखो गरीब, गरजु, भूमिहीन व बेघर लाभार्थ्यांचे स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न पुर्ण झाले आहे. याकरीता अभियान कालावधीत विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. यामध्ये भुमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता, बहुमजली इमारतींची उभारणी, गृहसंकुले, बहुमजली गृहसंकुलांची उभारणी, डेमो हाऊसेसची उभारणी, डेमो हाऊसेस मध्ये कॉप-शॉप सुरू करणे, घरकुल मार्ट, मुलभूत नागरी सुविधा पुरविणे, विविध शासकीय योजनांच्या कृतीसंगमातून लाभ देणे, मॉडेल हाऊसेस उभारणे, महा आवास अभियान व मोदी आवास घरकुल योजना, अशा विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात आली. केंद्र शासनाने देखील या उपक्रमांसाठी महाराष्ट्राचे कौतुक केले आहे.

राज्यात राबविण्यात आलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या लेखी स्वरूपात यशोगाथा उपलब्ध आहेत. या सर्व नाविन्यपूर्ण उपक्रमांना राज्य व देश पातळीवर व्यापक प्रमाणात प्रसिध्दी मिळावी, या उपक्रमांच्या प्रसारातून जनजागृती व्हावी यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने या सर्व नाविन्यपूर्ण उपक्रमांचे चित्रीकरण तसेच मराठी व हिंदी भाषेत लघुपट निर्मितीचे काम केले आहे. या लघुपटांचा वापर माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रमांकरीता करण्याचे नियोजित आहे.





## पंचाय समिती मिरज अंतर्गत म्हैसाळ येथे घरकुल लाभार्थी मेळाव्याचे आयोजन

दिनांक ०७ जुन, २०२४ रोजी सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यामधील म्हैसाळ या गावी मंजुर घरकुले व अपूर्ण घरकुले असणाऱ्या लाभार्थ्यांसाठी घरकुल लाभार्थी मेळावा संपन्न झाला. या लाभार्थी मेळाव्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, रमाई आवास योजना, मोदी आवास घरकुल योजना व अटल बांधकाम कामगार आवास योजना अंतर्गत घरकुलांना मंजुरी दिलेले व अपूर्ण घरकुले असणारे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पंचायत समितीचे प्रभारी गट विकास अधिकारी श्री.ज्ञानदेव मडके यांनी उपस्थितांना घरकुल बांधकामाविषयी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी म्हैसाळचे सरपंच श्रीमती रश्मी शिंदे, विस्तार अधिकारी श्री.संतोष इंगळे, ग्राम विकास अधिकारी श्री.सुनिल कोरे, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री.स्वप्निल काशिद यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## नांदेड जिल्ह्यात मोदी आवास घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश

दिनांक १८ एप्रिल, २०२४ रोजी नांदेड जिल्ह्यातील बाभूळगाव तालुक्यांतर्गत मोदी आवास घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना कार्यारंभ आदेश देऊन मार्क आऊट देण्यात आले. घरकुल बांधकाम सुरु असलेल्या लाभार्थ्यांना गृहभेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले. याकामी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री.वृषांककुमार लोंढे यांनी विशेष परिश्रम घेतले.



## मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प संचालक व CSC यांचे प्रतिनिधी यांची विविध विषयांवर समन्वय बैठक

दिनांक २१ जून, २०२४ रोजी मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांचे अध्यक्षतेखाली व संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यातील सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक व CSC यांचे प्रतिनिधी यांची ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे प्रलंबित मानधनबाबत समन्वय बैठक संपन्न झाली.

संचालक, ग्रामीण गृहनिर्माण यांनी CSC कडील ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या मानधन, Performance Report, Invoices, देयके आणि अदायगी, इ. बाबतच्या प्रलंबित कामाबाबतची जिल्हानिहाय माहिती सादर केली. त्यानुसार C S C संस्थेने जिल्ह्यांकडे असलेल्या प्रलंबित रक्कमा (Outstanding Amount) व प्रलंबीत TDS रक्कमा बाबत जिल्हानिहाय सादर केली. याबाबत मा. प्रधान सचिवांनी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे मानधन अदायगीबाबत जिल्हानिहाय आढावा घेवून प्रकल्प संचालक व CSC संस्थेला पुढील प्रमाणे कार्यवाही करणेबाबत मा. प्रधान सचिव यांनी सुचित केले.

यामध्ये जिल्ह्यांनी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या मानधनाचे सर्व प्रलंबित Performance report CSC संस्थेस सादर करणे, CSC संस्थेने सर्व Invoice जिल्ह्यांना सादर करणे, त्याप्रमाणे सर्व जिल्ह्यांनी CSC संस्थेस देयके अदा करून सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना त्यांचे मानधन अदा होईल याची खबरदारी घेणे, CSC संस्थेने कोणत्याही जिल्ह्याचे Invoice TDS मुळे प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेणे, अशा सुचना मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांनी दिल्या.




## आवास सॉफ्ट प्रणालीच्या तांत्रिक मार्गदर्शनासाठी राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना आवास सॉफ्ट व PFMS प्रणालीमार्फत राबविण्यात येत आहे. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व विभागीय प्रोग्रॅमर व जिल्हा प्रोग्रॅमर यांना आवास सॉफ्ट प्रणाली संदर्भात तांत्रिक मार्गदर्शन तसेच योजना अंमलबजावणी करतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे जलदगतीने निराकरण करण्यासाठी दिनांक २० व २१ जून, २०२४ रोजी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन हॉटेल के स्टार, बेलापूर, नवी मुंबई येथे करण्यात आले.

दिनांक २० जुन, २०२४ रोजी या कार्यशाळेच्या शुभारंभा प्रसंगी मा.संचालक, ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी NIC नवी दिल्ली यांचेकडील श्री.नरेंद्र कुमार व श्री.दिपक शुक्ला, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे उपसंचालक श्री.नीलेश काळे, राज्य समन्वयक (IT) श्री.राम आघाव, राज्य समन्वयक (M&E) डॉ.संघरत्न सोनवणे, राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ श्री.दिनेश मोवळे यांच्यासह सर्व विभागीय प्रोग्रॅमर व जिल्हा प्रोग्रॅमर उपस्थित होते.

या कार्यशाळेमध्ये आवास सॉफ्ट प्रणालीवर IAY Closure, PM-JANMAN, केंद्र व राज्य पुरस्कृत योजना तसेच विभाग, जिल्हा , तालुका व ग्रामपंचायतस्तरावर येणाऱ्या तांत्रिक अडचणींवर श्री.नरेंद्र कुमार, श्री.दिपक शुक्ला, श्री.नीलेश काळे, श्री.राम आघाव व डॉ.संघरत्न सोनवणे यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. केंद्र व राज्य शासनाकडील अधिकाऱ्यांच्या समन्वयातून सर्वांच्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यात आले.






## विभागीय आयुक्त पुणे यांच्या अध्यक्षतेखाली कृती दल बैठक (Task Force) संपन्न

भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्धतेसाठी विभागीय आयुक्त, पुणे डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांचे अध्यक्षतेखाली **विभागीय कृती दल (Task Force) बैठक दिनांक २५ जून**, २०२४ रोजी पुणे विभागीय आयुक्त कार्यालय येथे संपन्न झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी, पुणे डॉ. सुहास दिवसे, जिल्हाधिकारी, सोलापूर श्री. कुमार आर्शीवाद, जिल्हाधिकारी, सांगली डॉ. राजा दयानिधी, जिल्हाधिकारी, सातारा श्री. जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे श्री. संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी,सोलापूर श्रीमती मनिषा आव्हाळे, मुख्य कार्यकारी अधिकारी,सातारा श्रीमती याशनी नागराजन, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, सांगली श्रीमती नंदिनी घाणेकर, प्रकल्प संचालक, सातारा श्री. संतोष हराळे, सदस्य सचिव तथा उपायुक्त (विकास) श्री. विजय मुळीक व सहाय्यक आयुक्त (विकास) डॉ. सोनाली घुले यांच्यासह इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये पुणे विभागात शिल्लक भूमिहिन लाभार्थ्यांची संख्या ५०५ असुन त्याबाबत गाव पातळीवर लाभार्थीनिहाय आढावा घेणे. गायरान जागेतील अतिक्रमणाबाबत शासन निर्णयाप्रमाणे प्रस्ताव सादर करणे. गावठाणातील अतिक्रमणे नियमित करणेबाबत कार्यवाही करणे. शासकीय जागेवरील अतिक्रमणाबाबत शासनाच्या संबंधित विभागाकडे प्रस्ताव सादर करणे. जागांच्या अडचणीवर मात करणेसाठी बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंट उभारणी सारखे उपक्रम राबविणे. पंडीत दिनदयाळ उपाध्याय योजनेतून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळवून देणे. अशा प्रकारच्या सूचना अध्यक्ष तथा विभागीय आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिल्या.



## जलद गतीने घरकुले पूर्ण करण्यासाठी सांगली जिल्ह्यात प्रकल्प संचालकांची मोहीम

सांगली जिल्ह्यात केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांची कामे जलद गतीने पूर्ण करण्यासाठी तसेच याकरीता विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सांगली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती नंदिनी घाणेकर यांनी जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींना क्षेत्रीय भेटी देवून घरकुलांची पहाणी केली. तसेच घरकुल बांधकामासंबंधीत अडचणींचे निराकरण केल्यामुळे जिल्ह्यात घरकुल बांधकाम जलद गतीने होत आहे.

यामध्ये श्रीमती नंदिनी घाणेकर यांनी माहे मे, २०२४ मध्ये २० तारखेला पंचायत समिती शिराळा, २४ तारखेला पंचायत समिती खानापूर व विटा, २८ तारखेला पंचायत समिती कवठे महांकाळ व ७ तारखेला पंचायत समिती आटपाडी येथे पंचायत समिती कार्यालयास भेट देवून विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला. तसेच पंचायत समिती आवारातील डेमो हाऊसला भेट देवून कॉप-शॉप सुरू करणे बाबत मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे संबंधित तालुक्यांतर्गत गावाना क्षेत्रीय भेटी देवून मंजूर घरकुले, अपूर्ण घरकुले, कामे प्रगतीत असलेली घरकुले व पूर्ण झालेल्या घरकुलांची तपासणी केली व लाभार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.






## लाभार्थी व शासकीय यंत्रणेच्या समन्वयासाठी राज्यस्तरीय अधिकाऱ्यांचे दौरे

राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध ग्रामीण योजनांतर्गत शासकीय यंत्रणा व लाभार्थी यांच्यात समन्वय राखण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील उपसंचालकांनी क्षेत्रीय भेटी देवून लाभार्थी व शासकीय यंत्रणा यांना एकत्रित आणून मार्गदर्शन केले.

यामध्ये उपसंचालक श्री.नीलेश काळे यांनी रायगड जिल्ह्यातील तर श्रीमती राजलक्ष्मी येरपुडे यांनी नागपूर जिल्ह्यातील विविध आवास योजनेतील घरकुलांची पाहणी केली. तसेच गट विकास अधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर,ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, ग्रामसेवक व लाभार्थी यांच्या समन्वय बैठका घेवून निधी वितरण, घर बांधकाम व इतर विषयांवर मार्गदर्शन केले.





## कागल मध्ये एक दिवस घरकुलासाठी उपक्रमातून अपूर्ण घरकुल अडचणींचा शोध

राज्यात घरकुल मंजूर होवून किंवा पहिला हप्ता घेवून घरकुलांची कामे प्रलंबित असतात. अशा लाभार्थ्यांचे घरकुले पूर्ण करण्यासाठी राज्यस्तरावरून विविध उपक्रम राबविण्यात येतात. असाच काही एक दिवस घरकुलासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम कोल्हापूर जिल्ह्यातील कागल पंचायत समितीमध्ये राबविण्यात आला.

दिनांक १५ जून, २०२४ रोजी पंचायत समिती कागल मार्फत एक दिवस घरकुलासाठी या नाविन्यपूर्ण उपक्रमा अंतर्गत एकूण १००१ अपूर्ण घरकुलांना ५३ क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत प्रत्यक्ष गृहभेट देवून घरकुले अपूर्ण राहण्याची कारणे शोधण्यात आली. यामध्ये पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. कुलदिप बोंगे यांच्यासह सर्व खाते प्रमुख, विस्तार अधिकारी, शाखा अभियंता, अंगणवाडी पर्यवेक्षक, क्लार्क, बचत गट समन्वयक, स्वच्छ भारत मिशन समन्वयक, नरेगा समन्वयक व इतर पंचायत समिती स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश करण्यात आला.

या उपक्रमाच्या माध्यमातून या सर्व अधिकाऱ्यांनी घरकुल लाभार्थ्यांना गृहभेटी देवून घरकुलांची कामे प्रलंबित असल्याची कारणे शोधून त्यानुसार एकूण ६१० लाभार्थ्यांची माहिती गूगल शिटवर भरली आहे. या माहितीच्या आधारे त्यांच्या अडचणी दूर करून घरकुलांचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे काम पंचायत समिती कागल करीत आहे.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कळमेश्वर येथे बैठक

दिनांक २७ मे, २०२४ रोजी नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यांतर्गत लोहगड, सहूली, सोनेगाव, गोंडखैरी, मोहगाव, धापेवडा ग्रामपंचायतील ग्रामसेवक व रोजगार सेवक यांची समन्वय बैठक पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्रीमती अंशुजा गराटे यांनी त्यांच्या कार्यालयात घेतली. या बैठकीमध्ये सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून घरकुलांची कामे जलद गतीने पूर्ण करण्याचे सुचित केले.



## शाहुवाडी येथे प्रलंबित घरकुले रद्द करणे व अपूर्ण घरकुले पूर्ण करणे बाबत बैठक

दिनांक ०२ एप्रिल, २०२४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील पंचायत समिती शाहुवाडी येथे गट विकास अधिकारी श्री.कुचेवार यांच्या अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रलंबित घरकुलांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री. कानडे, कनिष्ठ सहाय्यक श्रीमती क्षीरसागर, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री.राहुल कांबळे, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना व प्रलंबित घरकुलांचा आढावा घेवून जे लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास इच्छुक नाही अशा लाभार्थ्यांचे घरकुल रद्द करण्याचे ठराव घेणे, जे लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास तयार आहे, अशा लाभार्थ्यांची तात्काळ बांधकाम सुरू करणे व मंजूर घरकुलांची कामे लेआऊट देवून सुरू करणे, अशा सूचना गट विकास अधिकारी श्री.कुचेवार यांनी उपस्थितांना दिल्या.



## जत तालुक्यात अपूर्ण घरकुले २१ दिवसात पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम

दिनांक ०७ जून, २०२४ रोजी सांगली जिल्ह्यातील जत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री.उदयकुमार कुसुरकर यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी यांची सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीला पंचायत समितीचे सर्व विस्तार अधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर व इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये विविध आवास योजनांतर्गत घरकुले पूर्ण करून घेण्याच्या दृष्टीने कडेगांव व वाळवा या गावांमध्ये २१ दिवस घरकुलासाठी मोहीम राबविण्याचा निर्णय गट विकास अधिकारी यांनी घेतला. त्यानुसार २१ दिवसात घरकुल बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले. तसेच केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांतर्गत घरकुलांना मंजूरी देणे. कामे सुरू नसलेली घरकुले रिफंड/रिमांड करणे व बोजा चढवणे बाबत कार्यवाही करणे. Plinth व Lintel level वर असलेली घरकुले दिनांक ३० जून, २०२४ अखेर पूर्ण करणे. भौतिकदृष्ट्या पूर्ण घरकुले आर्थिकदृष्या पूर्ण करणे.अशा सूचना गट विकास अधिकारी श्री.उदयकुमार कुसुरकर यांनी उपस्थितांना दिल्या.



## प्रलंबित घरकुले पुर्ण करण्यासाठी 'लोक अदालत' प्रभावी माध्यम

राज्यात महा आवास अभियान २०२३-२४ अंतर्गत विविध उपक्रम राबवून ग्रामीण भागातील लोकांचे पक्क्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वस्तरावरून प्रयत्न करण्यात येत आहे. परंतु काही लाभार्थ्यांनी घरकुलाचा पहिला हप्ता घेवून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटून अद्यापही घरकुल बांधकामास सुरूवात केली नाही. अशा लाभार्थ्यांना वारंवार बैठका, लाभार्थी मेळावे, गृह भेटी व इतर सर्व मार्गाने समजावण्याचा प्रयत्न केला. तरी या लाभार्थ्यांनी घरकुल बांधकाम सुरू केले नाही. अशा घरकुल लाभार्थ्यांसाठी तालुकास्तरावर कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने 'लोक अदालत' द्वारे लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत आहे. प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी 'लोक अदालत' प्रभावी माध्यम ठरले आहे. लोक अदालत व्दारे प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी जिल्ह्यांमध्ये मोहीम राबविली जात आहे.



# महाराष्ट्र राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत लघुपट निर्मिती

केंद्र शासनाच्या "सर्वांसाठी घरे - २०२४" हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या धोरणाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच सद्यस्थितीत राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी राज्यात दि. २० नोव्हेंबर, २०२० रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून " **महा आवास अभियान-ग्रामीण**" राबविण्यात आले. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते व मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, मा.राज्यमंत्री, ग्रामविकास व महसूल व मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सर्व शासकीय यंत्रणेसोबतच लोकप्रतिनिधी यांच्या सक्रीय सहभागामुळे या अभियानात लाखो गरीब, गरजू, बेघर व भुमीहीन लाभार्थ्यांचे घरकुलांचे स्वप्न पूर्ण झाले. राज्यात राबविण्यात आलेल्या महा आवास अभियानामुळे कदाचित ही ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील आजपर्यंतची सर्वात मोठी उपलब्धी असावी.

राज्यात सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात राबविण्यात आलेल्या महा आवास अभियानाचे यश व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये आलेली गतिमानता व गुणवत्ता यामध्ये सातत्य राखण्यासाठी शासनाने सन २०२१-२२, सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या वर्षातही राज्यात महा आवास अभियान राबविण्यात आले. या सर्व अभियानामध्ये लाखो लाभार्थ्यांना हक्काचा पक्का निवारा तर मिळालाच, पण त्यासोबतच बहुमजली इमारतींची उभारणी, गृहसंकुलांची उभारणी, हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी, लॅण्ड बँक निर्मिती, सॅण्ड बँक निर्मिती, मॉडेल हाऊसेसची निर्मिती, लाभार्थ्यांना घरकुलासह कृती संगमातून विविध शासकीय योजना व मुलभूत नागरी सुविधांचा लाभ, कॉप-शॉप व घरकुल मार्ट सुरूवात यासारखे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमही अभियानात यशस्वीपणे राबविण्यात आले. हे उपक्रम कौतुकास्पद असून देशातील सर्व राज्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे केंद्र सरकारने सांगून महाराष्ट्र शासनाच्या या कार्याची दखल घेतली आहे, ही बाब आपल्या राज्यासाठी मानाची आहे.

सन २०२०-२१ ते आजपर्यंत महा आवास अभियानांतर्गत राज्यात राबविण्यात आलेल्या सर्व नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या यशोगाथा राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने लिखित स्वरूपात संग्रहीत केल्या आहेत. तसेच वेळोवेळी या यशोगाथांना महा आवास त्रैमासिकाच्या माध्यमातून प्रसिध्दी देवून सर्व भागधारकांपर्यंत पोहोचविण्याचे कामही राज्यस्तरावरून करण्यात आले आहे. परंतु महाराष्ट्रासह देशातील सर्व स्तरांपर्यंत या नाविन्यपूर्ण उपक्रमांची प्रभावीपणे प्रचार, प्रसिध्दी होवून लोकांमध्ये ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांची जनजागृती व्हावी, यासाठी या सर्व नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या यशोगाथांचे मराठी व हिंदी भाषांमध्ये चित्रीकरण व त्यांचे लघुपट होणे गरजेचे होते.

त्याकरीता राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने या सर्व यशोगाथांचे चित्रीकरण करून लघुपट निर्मिती करण्याचे काम हाती घेतले. त्याकरीता या सर्व नाविन्यपूर्ण उपक्रमांना क्षेत्रीय भेटी देवून त्यांचे चित्रीकरण करण्यात आले. तसेच या नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये सर्व सहभागी यंत्रणा जसे-जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, सरपंच, लाभार्थी व लोक यांच्याही मनोगताचे चित्रीकरण करण्यात आले. त्याचप्रमाणे मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज तसेच राज्यस्तरावरील वरिष्ठ अधिकारी व पदाधिकारी यांच्याही मुलाखती घेण्यात आल्यात. चित्रीकरणाचे सर्व काम पूर्ण झाल्यावर या सर्व नाविन्यपूर्ण उपक्रमांचे ३ ते ४ मिनिटाचे लघुपट तयार करण्यात आले. हे लघुपट मराठी व हिंदी भाषेत असून यामुळे नाविण्यपूर्ण उपक्रमांची संकल्पना व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात या उपक्रमांचे फायदे समजण्यास मदत होते.






# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

## संचित प्रगती अहवाल - ३० जुन २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ५०२७ | ५०२७ | ४९७६ | ९८.९९% | १ | ५४ |
| २ | रत्नागिरी | ९६३९ | ९६३९ | ९५२१ | ९८.७८% | २ | ७२ |
| ३ | रायगड | ९६६६ | ९६६६ | ९५०२ | ९८.३०% | ३ | १०० |
| ४ | पालघर | ३५१०० | ३५१०० | ३४४४९ | ९८.१५% | ५ | १३० |
| ५ | ठाणे | ९४८४ | ९४८४ | ९१९९ | ९६.९९% | ७ | १५१ |
| | **कोकण विभाग** | **६८९१६** | **६८९१६** | **६७६४७** | **९८.१६%** | **१** | |
| ६ | गोंदिया | ९५२४८ | ९५२४८ | ९३५२८ | ९८.१९% | ४ | १९५ |
| ७ | गडचिरोली | ३१४९८ | ३१४९८ | २९८२९ | ९४.७०% | १० | २६२ |
| ८ | भंडारा | ६३४५० | ६३४५० | ५९७५३ | ९४.१७% | १२ | २७० |
| ९ | वर्धा | १७५०७ | १७५०७ | १६४४१ | ९३.९१% | १३ | ८७ |
| १० | नागपूर | ३५७५९ | ३५७५९ | ३३०३० | ९२.३७% | १६ | ३३७ |
| ११ | चंद्रपूर | ४१९०१ | ४१९०१ | ३८२५८ | ९१.३१% | १९ | १५७ |
| | **नागपूर विभाग** | **२८५३६३** | **२८५३६३** | **२७०८३९** | **९४.९१%** | **२** | |
| १२ | नाशिक | ८९०५३ | ८९०५३ | ८४५५६ | ९४.९५% | ९ | १९८ |
| १३ | नंदुरबार | ११८२७६ | ११८२७६ | १११८४४ | ९४.५६% | ११ | ३१९ |
| १४ | अहमदनगर | ५९३५४ | ५९३५४ | ५५२७९ | ९३.१३% | १४ | १३४ |
| १५ | धुळे | ६४५७७ | ६४५७७ | ५९२६४ | ९१.७७% | १७ | ३२१ |
| १६ | जळगाव | ७६८८८ | ७६८८८ | ६६५२० | ८६.५२% | २५ | ४७० |
| | **नाशिक विभाग** | **४०८१४८** | **४०८१४८** | **३७७४६३** | **९२.४८%** | **३** | |
| १७ | सातारा | १४२७८ | १४२७८ | १३९२४ | ९७.५२% | ६ | १० |
| १८ | कोल्हापूर | १६६९६ | १६६९६ | १५२६७ | ९१.४४% | १८ | १२१ |
| १९ | सांगली | २०४२९ | २०४२९ | १८५२५ | ९०.६८% | २० | ४५१ |
| २० | सोलापूर | ४४४०४ | ४४४०४ | ३९२३३ | ८८.३५% | २३ | ३३४ |
| २१ | पुणे | १८७३७ | १८७३७ | १६५१७ | ८८.१५% | २४ | ४१५ |
| | **पुणे विभाग** | **११४५४४** | **११४५४४** | **१०३४६६** | **९०.३३%** | **४** | |
| २२ | वाशिम | १८२५८ | १८२५८ | १७६२० | ९६.५१% | ८ | ६१ |
| २३ | अकोला | ४६४६९ | ४६४६९ | ४३२७४ | ९३.१२% | १५ | ३७४ |
| २४ | यवतमाळ | ६२८०२ | ६२८०२ | ५६६७५ | ९०.२४% | २१ | १६१ |
| २५ | अमरावती | ८९७४१ | ८९७४१ | ७९५०४ | ८८.५९% | २२ | ४६४ |
| २६ | बुलढाणा | ४२०९१ | ४२०९१ | ३३८८२ | ८०.५०% | ३४ | ४५० |
| | **अमरावती विभाग** | **२५९३६१** | **२५९३६१** | **२३०९५५** | **८९.०५%** | **५** | |
| २७ | धाराशिव | १३००६ | १३००६ | ११२३० | ८६.३४% | २६ | ३९२ |
| २८ | जालना | २३७९० | २३७९० | २०३४३ | ८५.५१% | २७ | ३४५ |
| २९ | छत्रपती संभाजी नगर | ३६०५६ | ३६०५६ | ३०६५० | ८५.०१% | २८ | ३०० |
| ३० | नांदेड | ६८३०६ | ६८३०६ | ५७९३० | ८४.८१% | २९ | ५२२ |
| ३१ | लातूर | १९३३९ | १९३३९ | १६३९२ | ८४.७६% | ३० | ४१४ |
| ३२ | बीड | ३४३६४ | ३४३६४ | २९०९० | ८४.६५% | ३१ | ४१२ |
| ३३ | हिंगोली | १७३८७ | १७३८७ | १४६८४ | ८४.४५% | ३२ | ११७ |
| ३४ | परभणी | १८६९२ | १८६९२ | १५०५९ | ८०.५६% | ३३ | १८२ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **२३०९४०** | **२३०९४०** | **१९५३७८** | **८४.६०%** | **६** | |
| | **एकूण** | **१३६७२७२** | **१३६७२७२** | **१२४५७४८** | **९१.११%** | | |

# रमाई आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जुन २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | २१५८ | २१५८ | २०२७ | ९३.९३% | २ |
| २ | रत्नागिरी | ६७५० | ६६५४ | ६१४४ | ९२.३४% | ३ |
| ३ | पालघर | ५५७ | ५१३ | ४३८ | ८५.३८% | ५ |
| ४ | रायगड | २५५१ | २३९९ | १९४६ | ८१.१२% | ११ |
| ५ | ठाणे | १५६६ | १५४५ | १०९७ | ७१.००% | २० |
| | **कोकण विभाग** | **१३५८२** | **१३२६९** | **११६५२** | **८७.८१%** | **१** |
| ६ | सातारा | ११२०३ | ११२०३ | १०५५७ | ९४.२३% | १ |
| ७ | सांगली | १००१४ | ९४६४ | ७६६४ | ८०.९८% | १२ |
| ८ | पुणे | १०३१७ | १०६१८ | ८१९५ | ७७.१८% | १३ |
| ९ | कोल्हापूर | १६१७३ | १५८७२ | ११८४४ | ७४.६२% | १४ |
| १० | सोलापूर | २२४३९ | २१२९८ | १५७०० | ७३.७२% | १५ |
| | **पुणे विभाग** | **७०१४६** | **६८४५५** | **५३९६०** | **७८.८३%** | **२** |
| ११ | गडचिरोली | ७८८० | ७२०२ | ६१०७ | ८४.८०% | ६ |
| १२ | भंडारा | १४५९० | ११७६६ | ९७६६ | ८३.००% | ७ |
| १३ | वर्धा | ८५६९ | ८५६९ | ७११० | ८२.९७% | ८ |
| १४ | गोंदिया | १३०७८ | ११९९७ | ९७८० | ८१.५२% | ९ |
| १५ | चंद्रपूर | २५१५४ | २१९२९ | १६०३६ | ७३.१३% | १८ |
| १६ | नागपूर | २००३९ | १२३६४ | ७९५८ | ६४.३६% | ३२ |
| | **नागपूर विभाग** | **८९३१०** | **७३८२७** | **५६७५७** | **७६.८८%** | **३** |
| १७ | अहमदनगर | ३१०७४ | ३१०६९ | २६६३५ | ८५.७३% | ४ |
| १८ | नंदुरबार | ४३६४ | ३४५५ | २८०५ | ८१.१९% | १० |
| १९ | जळगाव | २०३२४ | २०२४८ | १४९०५ | ७३.६१% | १६ |
| २० | नाशिक | २२२३३ | १५४२० | १००४४ | ६५.१४% | २९ |
| २१ | धुळे | १२४०१ | १०७९० | ६९७५ | ६४.६४% | ३१ |
| | **नाशिक विभाग** | **९०३९६** | **८०९८२** | **६१३६४** | **७५.७७%** | **४** |
| २२ | वाशिम | १२७९१ | १२६५८ | ९०६० | ७१.५८% | १९ |
| २३ | अकोला | २८५९२ | २४२६७ | १७११८ | ७०.८७% | २१ |
| २४ | अमरावती | २००४९ | १९५५४ | १३४१६ | ६८.६१% | २५ |
| २५ | बुलढाणा | २४३१९ | २३०५५ | १५५८५ | ६७.६०% | २६ |
| २६ | यवतमाळ | २०१०१ | १९८७६ | १३२४३ | ६६.६३% | २७ |
| | **अमरावती विभाग** | **१०५८५२** | **९९४१०** | **६८५०२** | **६८.९१%** | **५** |
| २७ | परभणी | २४४२३ | १९८८७ | १४६०० | ७३.४१% | १७ |
| २८ | बीड | ३०७३५ | २९४४५ | २०७१७ | ७०.३६% | २२ |
| २९ | लातूर | ३३२८२ | ३२९६३ | २३०८० | ७०.०२% | २३ |
| ३० | धाराशिव | २१४४७ | १८७९९ | १३१५१ | ६९.९६% | २४ |
| ३१ | नांदेड | २५९५० | २४६१९ | १६२४५ | ६५.९९% | २८ |
| ३२ | छत्रपती संभाजी नगर | २९११० | २७५९८ | १७८९३ | ६४.८३% | ३० |
| ३३ | हिंगोली | २०७२८ | १६३२९ | १००६५ | ६१.६४% | ३३ |
| ३४ | जालना | ३५७३५ | २७१०० | १५३७४ | ५६.७३% | ३४ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **२२१४१०** | **१९६७४०** | **१३११२५** | **६६.६५%** | **६** |
| | **एकूण** | **५९०६९६** | **५३२६८३** | **३८३३६०** | **७१.९७%** | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जुन २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ४३ | २९ | २९ | १००.०% | १ |
| २ | रत्नागिरी | ३४० | २६४ | २५२ | ९५.४५% | ३ |
| ३ | पालघर | १४३८५ | १४३५१ | १०४०३ | ७२.४९% | ८ |
| ४ | रायगड | ६६१० | ६४८९ | ४२४८ | ६५.४६% | १३ |
| ५ | ठाणे | ५४३० | ४४६८ | २४०० | ५३.७२% | २१ |
| **कोकण विभाग** | | **२६८०८** | **२५६०१** | **१७३३२** | **६७.७०%** | **१** |
| ६ | कोल्हापूर | ६० | २५ | २४ | ९६.००% | २ |
| ७ | सातारा | १९७ | १९७ | १८४ | ९३.४०% | ४ |
| ८ | सोलापूर | ८९४ | ६८६ | ५९६ | ८६.८८% | ५ |
| ९ | सांगली | ८० | ५० | ४३ | ८६.००% | ६ |
| १० | पुणे | ६७३६ | ६१२७ | ३२६५ | ५३.२९% | २२ |
| **पुणे विभाग** | | **७९६७** | **७०८५** | **४११२** | **५८.०४%** | **२** |
| ११ | गोंदिया | ५५९९ | ५५४७ | ३९६१ | ७१.४१% | ९ |
| १२ | वर्धा | ५६९२ | ५६९२ | ३८५७ | ६७.७६% | १० |
| १३ | भंडारा | ६३३६ | ६३०१ | ४२४३ | ६७.३४% | ११ |
| १४ | गडचिरोली | १०९५१ | १०३४३ | ६७८४ | ६५.५९% | १२ |
| १५ | चंद्रपूर | २३१८२ | २०८४० | ९२०७ | ४४.१८% | ३१ |
| १६ | नागपूर | १३१८८ | ११७०६ | ४४३७ | ३७.९०% | ३३ |
| **नागपूर विभाग** | | **६४९४८** | **६०४२९** | **३२४८९** | **५३.७६%** | **३** |
| १७ | अहमदनगर | ८६४६ | ८४२९ | ५२५९ | ६२.३९% | १४ |
| १८ | नंदुरबार | ४७०४६ | १८३५२ | १०८८६ | ५९.३२% | १६ |
| १९ | धुळे | १८५१८ | १६१८१ | ८८१४ | ५४.४७% | २० |
| २० | जळगाव | १३३३१ | १३२९५ | ६९२३ | ५२.०७% | २३ |
| २१ | नाशिक | २७४५६ | २६६८० | १२२३५ | ४५.८६% | २९ |
| **नाशिक विभाग** | | **११४९९७** | **८२९३७** | **४४११७** | **५३.१९%** | **४** |
| २२ | लातूर | १५३८ | ६२९ | ५२१ | ८२.८३% | ७ |
| २३ | धाराशिव | ५४९ | ४७७ | २९१ | ६१.०१% | १५ |
| २४ | बीड | २२३० | ११३५ | ६५३ | ५७.५३% | १८ |
| २५ | छत्रपती संभाजी नगर | ७७८७ | ५७३३ | २९७६ | ५१.९१% | २४ |
| २६ | परभणी | ३८८७ | २०२९ | १०४७ | ५१.६०% | २६ |
| २७ | हिंगोली | १८०३५ | १२३०८ | ६२९३ | ५१.१३% | २७ |
| २८ | जालना | २९५६ | १२५५ | ५८० | ४६.२२% | २८ |
| २९ | नांदेड | ७९९१ | २८१७ | ११८१ | ४१.९२% | ३२ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **४४९७३** | **२६३८३** | **१३५४२** | **५१.३३%** | **५** |
| ३० | अकोला | ५८१५ | ४६४४ | २७०७ | ५८.२९% | १७ |
| ३१ | वाशिम | २९७० | २६९९ | १५०२ | ५५.६५% | १९ |
| ३२ | यवतमाळ | १४३२२ | १४२९८ | ७४०२ | ५१.७७% | २५ |
| ३३ | बुलढाणा | ४१९१ | २८९३ | १३१४ | ४५.४२% | ३० |
| ३४ | अमरावती | १५२३५ | १४८७६ | ५४८० | ३६.८४% | ३४ |
| **अमरावती विभाग** | | **४२५३३** | **३९४१०** | **१८४०५** | **४६.७०%** | **६** |
| **एकूण** | | **३०२२२६** | **२४१८४५** | **१२९९९७** | **५३.७५%** | |

# पारधी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जुन २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे | ४३२ | ४३२ | ४२१ | ९७.४५% | ९ |
| २ | अहमदनगर | १९८ | १९८ | १८३ | ९२.४२% | १४ |
| ३ | जळगाव | ५७० | ५६९ | ५२२ | ९१.७४% | १५ |
| ४ | नाशिक | १४३ | १३७ | ११४ | ८३.२१% | २३ |
| ५ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.००% | २९ |
| नाशिक विभाग | | १३५३ | १३३६ | १२४० | ९२.८१% | १ |
| ६ | वाशिम | ६४ | ६४ | ६४ | १००% | ८ |
| ७ | अकोला | ३७३ | ३७३ | ३६० | ९६.५१% | ११ |
| ८ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५६ | ९५.९६% | १२ |
| ९ | अमरावती | ४४९ | ४४४ | ४१८ | ९४.१४% | १३ |
| १० | यवतमाळ | ५९४ | ५९४ | ५०३ | ८४.६८% | २१ |
| अमरावती विभाग | | १८५१ | १८४६ | १७०१ | ९२.१५% | २ |
| ११ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००% | १ |
| १२ | लातूर | १७ | १३ | १३ | १००% | ३ |
| १३ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००% | ४ |
| १४ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००% | ५ |
| १५ | जालना | ३८ | ३६ | ३३ | ९१.६७% | १६ |
| १६ | बीड | ९२ | ८६ | ७८ | ९०.७०% | १७ |
| १७ | छत्रपती संभाजी नगर | ५७ | ५१ | ४६ | ९०.२०% | १८ |
| १८ | धाराशिव | २४७ | २४७ | २०९ | ८४.६२% | २२ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | ५९२ | ५६६ | ५१२ | ९०.४६% | ३ |
| १९ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००% | २ |
| २० | सातारा | २४ | २४ | २४ | १००% | ६ |
| २१ | सोलापूर | २३१ | २०२ | १९५ | ९६.५३% | १० |
| २२ | सांगली | ३८ | २६ | २३ | ८८.४६% | २० |
| २३ | पुणे | १८८ | १७४ | १३६ | ७८.१६% | २४ |
| पुणे विभाग | | ४८८ | ४३३ | ३८५ | ८८.९१% | ४ |
| २४ | वर्धा | ५० | ५० | ५० | १००.०% | ७ |
| २५ | नागपूर | ४८ | ४८ | ४३ | ८९.५८% | १९ |
| २६ | चंद्रपूर | ३५ | ३३ | २२ | ६६.६७% | २५ |
| नागपूर विभाग | | १३३ | १३१ | ११५ | ८७.७९% | ५ |
| २७ | रायगड | २ | ० | ० | ०.०% | ३१ |
| २८ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.०% | ३२ |
| कोकण विभाग | | ३ | ० | ० | ०.०% | ६ |
| एकूण | | ४४२० | ४३१२ | ३९५३ | ९१.६७% | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जुन २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदुर्ग | ६६ | ५० | ५० | १००% | १ |
| २ | पालघर | ११३१ | ११२८ | १०९७ | ९७.२५% | २ |
| ३ | रायगड | १३९४ | १३९४ | १३२१ | ९४.७६% | ३ |
| ४ | ठाणे | १५७८ | १५७१ | १४८५ | ९४.५३% | ४ |
| ५ | रत्नागिरी | ११ | ११ | १० | ९०.९१% | ५ |
| कोकण विभाग | | ४१८० | ४१५४ | ३९६३ | ९५.४०% | १ |
| ६ | गडचिरोली | १७७८ | १७५२ | १५७९ | ९०.१३% | ६ |
| ७ | चंद्रपूर | ७२३ | ६७० | ५०७ | ७५.६७% | ८ |
| ८ | वर्धा | ३९६ | ३९६ | २१७ | ५४.८०% | ११ |
| नागपूर विभाग | | २८९७ | २८१८ | २३०३ | ८१.७२% | २ |
| ९ | नांदेड | ४१९ | १८१ | १४३ | ७९.०१% | ७ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | ४१९ | १८१ | १४३ | ७९.०१% | ३ |
| १० | यवतमाळ | ४७८४ | ४६७२ | ३१२८ | ६६.९५% | ९ |
| अमरावती विभाग | | ४७८४ | ४६७२ | ३१२८ | ६६.९५% | ४ |
| ११ | नाशिक | ९८ | ३७ | २३ | ६२.१६% | १० |
| नाशिक विभाग | | ९८ | ३७ | २३ | ६२.१६% | ५ |
| १२ | पुणे | ७५ | ७१ | ३३ | ४६.४८% | १२ |
| पुणे विभाग | | ७५ | ७१ | ३३ | ४६.४८% | ६ |
| एकूण | | १२४५३ | ११९३३ | ९५९३ | ८०.३९% | |

# प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महाअभियान

## संचित प्रगती अहवाल - ३० जुन २०२४

| अ.क्र. | जिल्हा | कच्ची घरकुले असलेल्या आदिम जातीचंची सुधारीत कुटंब संख्या | एकुण कुटुंब सर्वेक्षण | एकुण पात्र | एकुण नोंदणी | मंजुरी | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदेड | २१७ | २४८ | २४८ | १९४ | १७८ | ९७ | ५४.४९% | २ |
| छत्रपती संभाजी नगर विभाग | | २१७ | २४८ | २४८ | १९४ | १७८ | ९७ | ५४.४९% | १ |
| २ | पालघर | ६६४१ | ५५३२ | ४९८९ | ४०७२ | १२६९ | २२७ | १७.८९% | ४ |
| ३ | रायगड | १४८०१ | १६११९ | १२१७३ | ८२५४ | २१४२ | ३२१ | १४.९९% | ५ |
| ४ | रत्नागिरी | ६०० | ९७१ | ५५६ | ४६९ | २२० | २१ | ९.५५% | ६ |
| ५ | ठाणे | ६९०५ | ३२५७ | ३१२८ | १८४० | ५०५ | १ | ०.२०% | १२ |
| ६ | सिंधुदुर्ग | ३०८ | १७१ | ६७ | ४९ | ५ | ० | ०.००% | १६ |
| कोकण विभाग | | २९२५५ | २६०५० | २०९१३ | १४६८४ | ४१४१ | ५७० | १३.७६% | २ |
| ७ | अमरावती | २१ | २७ | २७ | २१ | २१ | १९ | ९०.४८% | १ |
| ८ | यवतमाळ | ९८४६ | ५७२२ | ४८७० | २९४८ | १३२३ | ९७ | ७.३३% | ७ |
| अमरावती विभाग | | ९८६७ | ५७४९ | ४८९७ | २९६९ | १३४४ | ११६ | ८.६३% | ३ |
| ९ | सातारा | २१६ | ८४७ | ७१३ | ६७५ | ३५ | ८ | २२.८६% | ३ |
| १० | पुणे | ३१३५ | २५६२ | २१७४ | ३४३ | ७३ | १ | १.३७% | ११ |
| ११ | कोल्हापूर | ४१ | २६ | २२ | २२ | ० | ० | ०.००% | १५ |
| पुणे विभाग | | ३३९२ | ३४३५ | २९०९ | १०४० | १०८ | ९ | ८.३३% | ४ |
| १२ | नाशिक | २६०६ | २७४९ | २२८६ | १७३२ | ८८४ | ३८ | ४.३०% | ८ |
| १३ | अहमदनगर | ५५ | ८४ | ६५ | ६२ | ३५ | ० | ०.००% | १३ |
| नाशिक विभाग | | २६६१ | २८३३ | २३५१ | १७९४ | ९१९ | ३८ | ४.१३% | ५ |
| १४ | वर्धा | ६७२ | ६८६ | ५९५ | ४४३ | १९८ | ७ | ३.५४% | ९ |
| १५ | गडचिरोली | १२५३५ | ७८६२ | ७१०३ | ४६८१ | ७५२ | २४ | ३.१९% | १० |
| १६ | चंद्रपूर | ५९३ | ६७५ | ४०७ | ३२८ | १९६ | ० | ०.००% | १४ |
| नागपूर विभाग | | १३८०० | ९२२३ | ८१०५ | ५४५२ | ११४६ | ३१ | २.७१% | ६ |
| एकूण | | ५९१९२ | ४७५३८ | ३९४२३ | २६१३३ | ७८३६ | ८६१ | १०.९९% | |

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जुन २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाशिम | ४१ | ४१ | २२ | ५३.६६% | ३ |
| २ | बुलढाणा | ८६ | ८१ | ३७ | ४५.६८% | ४ |
| **अमरावती विभाग** | | **१२७** | **१२२** | **५९** | **४८.३६%** | **१** |
| ३ | जळगाव | १९२ | १८७ | ४८ | २५.६७% | ५ |
| ४ | अहमदनगर | १५८ | १५३ | ० | ०.००% | ११ |
| ५ | नंदुरबार | २ | ० | ० | ०.००% | १३ |
| **नाशिक विभाग** | | **३५२** | **३४०** | **४८** | **१४.१२%** | **२** |
| ६ | कोल्हापूर | ५२५ | ५२५ | ११७ | २२.२९% | ६ |
| ७ | सातारा | २७३ | २०८ | ११ | ५.२९% | ९ |
| ८ | सोलापूर | २५९ | २४७ | ० | ०.००% | १५ |
| **पुणे विभाग** | | **१०५७** | **९८०** | **१२८** | **१३.०६%** | **३** |
| ९ | जालना | १०५ | १०४ | ५९ | ५६.७३% | २ |
| १० | परभणी | ४४०३ | १०७० | ६६ | ६.१७% | ८ |
| ११ | लातूर | ८३३ | ६९६ | ९ | १.२९% | १० |
| १२ | नांदेड | ५ | ० | ० | ०.००% | १२ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **५३४६** | **१८७०** | **१३४** | **७.१७%** | **४** |
| १३ | भंडारा | २२ | २१ | १४ | ६६.६७% | १ |
| १४ | गोंदिया | १५ | १४ | १ | ७.१४% | ७ |
| १५ | वर्धा | ५४८ | २६५ | ० | ०.००% | १६ |
| **नागपूर विभाग** | | **५८५** | **३००** | **१५** | **५.००%** | **५** |
| १६ | रायगड | १२ | १२ | ० | ०.००% | १४ |
| **कोकण विभाग** | | **१२** | **१२** | **०** | **०.००%** | **६** |
| **एकूण** | | **७४७९** | **३६२४** | **३८४** | **१०.६०%** | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जुन २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ६४५ | ११९ | ७४ | ६२.१८% | ४ |
| **कोकण विभाग** | | **६४५** | **११९** | **७४** | **६२.१८%** | **१** |
| २ | अमरावती | ५०७ | ३९४ | ३३० | ८३.७६% | २ |
| ३ | यवतमाळ | ४४९४ | ३९६१ | १०९७ | २७.७०% | ९ |
| ४ | वाशिम | ४० | ० | ० | ०.००% | २१ |
| **अमरावती विभाग** | | **५०४१** | **४३५५** | **१४२७** | **३२.७७%** | **२** |
| ५ | चंद्रपूर | ७२६० | ५७५७ | १७२३ | २९.९३% | ७ |
| ६ | भंडारा | २८०३ | २६५० | ७१४ | २६.९४% | १० |
| ७ | गोंदिया | ११६४ | ११२७ | १५५ | १३.७५% | १३ |
| ८ | नागपूर | ५४० | ७५ | ९ | १२.००% | १४ |
| **नागपूर विभाग** | | **११७६७** | **९६०९** | **२६०१** | **२७.०७%** | **३** |
| ९ | कोल्हापूर | ६५ | ६५ | ५८ | ८९.२३% | १ |
| १० | सातारा | १९५ | १९३ | १४१ | ७३.०६% | ३ |
| ११ | सोलापूर | १४ | १४ | ७ | ५०.००% | ५ |
| १२ | पुणे | २० | ० | ० | ०.००% | १९ |
| १३ | सांगली | १०६१ | ७५० | ० | ०.००% | २० |
| **पुणे विभाग** | | **१३५५** | **१०२२** | **२०६** | **२०.१६%** | **४** |
| १४ | लातूर | ३९१८ | ७२ | २३ | ३१.९४% | ६ |
| १५ | परभणी | ४४४ | ४२८ | १२६ | २९.४४% | ८ |
| १६ | धाराशिव | ३७७२ | १६९३ | ३२९ | १९.४३% | १२ |
| १७ | जालना | ९५११ | ४२२२ | ४९५ | ११.७२% | १५ |
| **छत्रपती संभाजी नगर विभाग** | | **१७६४५** | **६४१५** | **९७३** | **१५.१७%** | **५** |
| १८ | धुळे | १५२ | १४५ | ३९ | २६.९०% | ११ |
| १९ | जळगाव | १०४९ | ९३७ | ९७ | १०.३५% | १६ |
| २० | अहमदनगर | २० | **२०** | ० | ०.००% | १७ |
| २१ | नंदुरबार | ३५ | ० | ० | ०.००% | १८ |
| **नाशिक विभाग** | | **१२५६** | **११०२** | **१३६** | **१२.३४%** | **६** |
| **एकूण** | | **३७७०९** | **२२६२२** | **५४१७** | **२३.९५%** | |

# मोदी आवास घरकुल योजना

## संचित प्रगती अहवाल - ३० जुन २०२४

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | ६५४८ | ६५४८ | २०९८ | ३२.०४% | २ |
| २ | गोंदिया | १४४२९ | १४४२९ | ३६३६ | २५.२०% | ४ |
| ३ | वर्धा | ४९६५ | ४९६५ | १२३१ | २४.७९% | ५ |
| ४ | चंद्रपूर | १०८७४ | १०८७४ | २०४३ | १८.७९% | ८ |
| ५ | नागपूर | ६७४७ | ६७४३ | ८९६ | १३.२९% | १५ |
| ६ | भंडारा | ११०३३ | ११०३३ | ११८८ | १०.७७% | १९ |
| | **नागपूर विभाग** | **५४५९६** | **५४५९२** | **११०९२** | **२०.३२%** | **१** |
| ७ | अकोला | ७३५३ | ७३५३ | १८७० | २५.४३% | ३ |
| ८ | अमरावती | १४१७८ | १४१७८ | २६५४ | १८.७२% | ९ |
| ९ | यवतमाळ | २९९९९ | २९९९९ | ५२३० | १७.४३% | ११ |
| १० | वाशिम | १२४५५ | १२४५५ | १६७९ | १३.४८% | १४ |
| ११ | बुलढाणा | १७०५५ | १७०५५ | ८३० | ४.८७% | २८ |
| | **अमरावती विभाग** | **८१०४०** | **८१०४०** | **१२२६३** | **१५.१३%** | **२** |
| १२ | सिंधुदुर्ग | १३०८ | १३०८ | ३१७ | २४.२४% | ६ |
| १३ | पालघर | ४५८ | ४५८ | १०१ | २२.०५% | ७ |
| १४ | रायगड | २४५६ | २४५६ | ३५८ | १४.५८% | १३ |
| १५ | रत्नागिरी | ६३५६ | ६३५६ | ८१२ | १२.७८% | १७ |
| १६ | ठाणे | २५३८ | २५३८ | १५४ | ६.०७% | २५ |
| | **कोकण विभाग** | **१३११६** | **१३११६** | **१७४२** | **१३.२८%** | **३** |
| १७ | सातारा | १७७७ | १७७७ | ७६९ | ४३.२८% | १ |
| १८ | सांगली | १९५८ | १९५८ | ३१४ | १६.०४% | १२ |
| १९ | सोलापूर | ११०१९ | ११०१६ | १००९ | ९.१६% | २१ |
| २० | कोल्हापूर | २०३१ | २०१४ | १६७ | ८.२९% | २३ |
| २१ | पुणे | १५२१ | १५२१ | ६४ | ४.२१% | ३२ |
| | **पुणे विभाग** | **१८३०६** | **१८२८६** | **२३२३** | **१२.७०%** | **४** |
| २२ | धाराशिव | २२७४ | २२७४ | ४०२ | १७.६८% | १० |
| २३ | छत्रपती संभाजी नगर | ५८१२ | ५४६० | ७२३ | १३.२४% | १६ |
| २४ | नांदेड | २३५९८ | २३५९८ | २५४६ | १०.७९% | १८ |
| २५ | परभणी | १३५९६ | १३५६० | १३८५ | १०.२१% | २० |
| २६ | लातूर | ६३१८ | ६३१८ | ५७० | ९.०२% | २२ |
| २७ | जालना | ८४९६ | ८३५४ | ६७० | ८.०२% | २४ |
| २८ | हिंगोली | ३३५४ | ३३५४ | १९३ | ५.७५% | २७ |
| २९ | बीड | १६०४१ | १६०४१ | ४२४ | २.६४% | ३३ |
| | **छत्रपती संभाजी नगर विभाग** | **७९४८९** | **७८९५९** | **६९१३** | **८.७६%** | **५** |
| ३० | अहमदनगर | ४३५६ | ४३३६ | २५४ | ५.८६% | २६ |
| ३१ | जळगाव | २९५३१ | २९४९६ | १४०१ | ४.७५% | २९ |
| ३२ | नंदुरबार | २८७६ | २८७६ | १३६ | ४.७३% | ३० |
| ३३ | नाशिक | ६९८१ | ६९८१ | २९८ | ४.२७% | ३१ |
| ३४ | धुळे | ९७०९ | ९७०९ | १८४ | १.९०% | ३४ |
| | **नाशिक विभाग** | **५३४५३** | **५३३९८** | **२२७३** | **४.२६%** | **६** |
| | **एकूण** | **३०००००** | **२९९३९१** | **३६६०६** | **१२.२३%** | |

# स्वयं सहाय्यता समूह महिला गटामुळे पक्क्या घरकुलाची स्वप्नपूर्ती

**नागपूर विभागातील भंडारा जिल्हा व भंडारा तालुक्यामध्ये मोहदुरा गावातील श्रीमती प्रतिमा विष्णूचरण क्षीरसागर** यांना **मोदी आवास घरकुल योजने अंतर्गत** घरकुलाचा लाभ मिळाला आहे. त्यांना घरकुलासाठी शासनाकडून मिळालेले अर्थसहाय्य तसेच त्यांनी स्वयं सहाय्यता समूह गटाच्या मदतीने सुरू केलेल्या व्यवसायात झालेल्या उत्पन्नातून स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण केले.

श्रीमती प्रतिमा विष्णूचरण क्षीरसागर या मोहदुरा गावातील उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोंन्नती अभियान अंतर्गत त्यांच्या गावात ३४ स्वंय सहाय्यता समुह गट असून त्या सन २०१८ पासून अनन्या स्वंय सहाय्यता समुह गटाच्या सदस्य आहेत. या स्वंय सहाय्यता समुह गटात येण्यापूर्वी श्रीमती प्रतिमा विष्णूचरण क्षीरसागर यांना उमेद अभियानाच्या समन्वयकांनी उमेद अभियानाची सविस्तर माहिती तसेच स्वंय सहाय्यता समुह गटाचे फायदे समजावून सांगितले. गृहिणी ते उद्योजक झालेल्या महिलांच्या यशोगाथा सांगितल्या. त्यानुसार श्रीमती प्रतिमा विष्णूचरण क्षीरसागर यांनी स्वंय सहाय्यता समूह गटात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. उमेद अभियानाच्या बैठका, प्रशिक्षणे, मेळावे व अभ्यास दौरे या सारख्या उपक्रमात त्या वेळोवेळी उपस्थित राहत होत्या. याच माध्यमातून त्यांना **उडान महिला ग्राम** संघाची माहिती मिळत गेली. त्यासोबतच शासनाच्या विविध लाभदायी योजनांची माहिती मिळाली. गावात ग्रामसभेत या स्वंय सहाय्यता समूह गटाच्या सर्व महिला तत्पर असतात.

राज्य शासनाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांसाठी मोदी आवास घरकुल योजना सुरू केली आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून भंडारा पंचायत समिती कार्यालयाकडून मोदी आवास घरकुल योजने अंतर्गत मंजूर घरकुल लाभार्थ्यांची यादी प्रसिध्दी केली. त्याचप्रमाणे सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियत्यांनी लाभार्थ्यांना गृहभेटी देवून घरकुल बांधकाम सुरू करण्याचे पंचायत समिती कार्यालयामार्फत सूचित करण्यात आले. त्यानुसार श्रीमती प्रतिमा विष्णूचरण क्षीरसागर यांना मोदी आवास घरकुल योजनेतून घरकुल मंजूर झाल्याचे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी सांगितले.

श्रीमती प्रतिमा विष्णूचरण क्षीरसागर यांचे स्वप्न होते की, स्वतःचे पक्के घरकुल त्यामुळे शासनाकडून मिळणारे अनुदान पुरेशी नसून त्याकरीता पदरचेही पैसे घालावे लागतील याची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यासाठी त्या व त्यांचे कुटुंबीय पैशांची जुळवाजुळव करत होते,तरीही आवश्यक निधी उभा करता आला नाही. याबाबत त्यांनी स्वयं सहाय्यता समूह गटाच्या बैठकीत समस्या मांडली. त्यावर त्यांना समूह गटाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि त्यांना घरकुल बांधकामासाठी महिलांना बचत गटाकडून कर्ज स्वरूप रक्कम रू. ६०,०००/- देण्याचे आदेश भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. समीर कुर्तकोटी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.विवेक बोंद्रे यांनी दिले. मोदी आवास घरकुल योजना व स्वयं सहाय्यता समूह गटाकडून मिळालेल्या रक्कमेतून त्यांनी त्यांचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण केले. तसेच त्यांना मिळालेल्या रक्कमेतील रू.१०,०००/- च्या त्यांनी शेळ्या खरेदी करून शेळीपालनाचा व्यवसाय सुरू केला. यातून मिळत असलेल्या उत्पन्नातून श्रीमती प्रतिमा विष्णूचरण क्षीरसागर कर्जाची परतफेड करत आहेत.

समूह संघ, ग्राम संघ, व आता प्रभाग संघ हा प्रवास बघता आज माझ्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली असून वेळेवर घरासाठी, व्यवसायासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी, आजारपणासाठी कोणतीही मदत लागली तर मला माझ्या समूहाची, ग्राम संघाचा आधार आहे. पुढेही अशाच नवनवीन योजनेतून माझी माझ्या गावाची प्रगती उत्तरोत्तर व्हावी, अशी इच्छा श्रीमती प्रतिमा विष्णूचरण क्षीरसागर यांनी व्यक्त केली.





# अकोला जिल्ह्यातील निंभी खु. गावात उभारली सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत

निंभी खुर्द ग्रामपंचायत अकोला जिल्ह्यात बार्शीटाकळी तालुक्यामध्ये आहे. या गावामध्ये पिंजर्डा नदी, सोपीनाथ महाराज मंदिर आणि हनुमान मंदिर प्रसिध्द देवस्थान आहे. निंभी खुर्द ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या ७००, कुटूंब संख्या १६० असून विविध आवास योजनेतून १५ लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात आला आहे."महा आवास अभियान-ग्रामीण" मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामपंचायत निंभी खुर्द, तालुका बार्शीटाकळी, जिल्हा अकोला यांनी बहुमजली इमारतीची उभारणी केली आहे.

"महा आवास अभियान-ग्रामीण" अंतर्गत ग्रामपंचायत निंभी खुर्द येथील रहीवासी श्री. महादेव सुधाकर तायडे प्रधानमंत्री आवास योजना प्रपत्र ब मध्ये पात्र लाभार्थी होते. त्यांच्याकडे घरकुल बांधकामासाठी जागा नसल्यामुळे त्यांना घरकुल मंजूर होत नव्हते. त्याकरीता श्री. महादेव सुधाकर तायडे पंचायत समिती बार्शीटाकळी येथे भेट देवून त्यांची समस्या पंचायत समितीच्या अधिकारी/कर्मचारी यांना सांगितली. याबाबत पंचायत समितीच्या अधिकारी/कर्मचारी यांनी श्री. महादेव सुधाकर तायडे यांना बहुमजली इमारत बांधकाम करण्याबाबत मार्गदर्शन केले.

श्री. महादेव सुधाकर तायडे यांच्याप्रमाणेच त्यांची बहिण श्रीमती छाया विनोद वानखडे यांचेही घरकुल प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत मंजूर झाले होते. श्रीमती छाया वानखडे यांना पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या भावाची समस्या सांगितली. तसेच त्यांना बहुमजली इमारत बांधकामाच्या पर्यायाबाबत मार्गदर्शन केले. श्रीमती छाया वानखडे यांना बहुमजली इमारत बांधकामाचा पर्याय पटला व त्यांनी तशी संमती दिली. त्यानुसार गट विकास अधिकारी यांनी सरपंच व ग्रामसेवक यांना दोन लाभार्थ्यांसाठी बहुमजली इमारत बांधण्याचे सांगितले.दोन्ही लाभार्थीनी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, सरपंच व ग्राममसेवक यांच्या सहकार्याने बहुमजली इमारतीचे बांधकाम केले. याकामी पंचायत समिती स्तरावरून सर्वोतोपरी मार्गदर्शन व सहकार्य लाभार्थींना करण्यात आले. बहुमजली इमारत बांधकामाकरीता सरपंच व ग्रामसेवक यांनी वाळू, सिमेंट, विटा व इतर बांधकाम साहित्य उपलब्ध करून दिल्याने लाभार्थींना मोठी मदत झाली. सर्वांच्या सहकार्यामुळे अत्यंत अल्प कालावधीत बहुमजली इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले. जागा नसतानाही बहुमजली इमारतीच्या माध्यमातून स्वतःचे घरकुल मिळाल्याने श्री. महादेव सुधाकर तायडे यांनी पंचायत समिती व ग्रामपंचायतीचे अधिकारी व पदाधिकारी या सर्वांचे आभार मानले.

लाभार्थींना घरकुला सोबतच इतर शासकीय योजनांच्या कृतीसंगमामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार" हमी योजनेतून रोजगार, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण मधून शौचालय, प्रधानमंत्री उज्वला योजनेमधून गॅस जोडणी, सौभाग्य योजनेमधून विद्युत जोडणी, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना मधून उपजिविकेचे साधन इ. योजनांचा लाभ देण्यात आला.

"महा आवास अभियान-ग्रामीण" मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत पुरेशी जागा उपलब्ध नसल्यास बहुमजली इमारत उभारणे या उपक्रमात निंभी खुर्द ग्रामपंचायतीने सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याकरीता प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत निंभी खुर्द ग्रामपंचायतीला सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत म्हणून तृतीय क्रमांकाच्या 'महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार' मा.मुख्यमंत्री, श्री.एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते व मा.उप मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

त्यांच्या या यशस्वी कामगिरीसाठी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या या यशात ग्रामपंचायतस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समितीच्या सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.





## महा आवास अभियानामुळे मिळाला सुरक्षित हक्काचा पक्कानिवारा

उमरखेडा हे गाव मराठवाड्यातील जालना जिल्ह्यामधील भोकरदन तालुक्यात येते. या गावामध्ये प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांना सन २०२१-२२ मध्ये महा आवास अभियानामुळे घरकुलाचा लाभ मिळाला आहे.त्यासोबतच शासकीय योजनांच्या कृती संगमामुळे इतर शासकीय योजनांचा लाभ मिळाल्याने त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे.

श्री.रामेश्वर साहेबराव फुके उमरखेडा गावात जुन्या, कच्च्या व पत्राच्या घरात कुटुंबीयांसह राहत होते. पावसाळ्यात पत्रे गळायचे, हिवाळ्यात पत्रे थंड व्हायचे तर उन्हाळ्यात पत्रे तापायचे त्यासोबतच विंचू, साप व इतर विषारी जीवजंतूचीही भिती होती. यामुळे घरात वावरतांना व झोपतांना कायम भिती असायची. आपले स्वतःचे पक्के घर कधी होणार व आपण सुखाची झोप कधी घेणार ही चिंता त्यांच्या मनी कायम असायची.

अशातच राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना यासह पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी राज्यात महाआवास अभियान २०२१-२२ राबविण्यात आले. या अभियानामुळे श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांना प्रधानमंत्री आवास योजेना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजूर झाले. त्यांना याविषयी ग्रामसेवक व सरपंच यांनी संपर्क साधून योजनेची व आवश्यक कागपत्राची सविस्तर माहिती दिली. त्यानुसार श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांनी कागदपत्रांची पूर्तता करून दिली. अभियानामुळे त्यांच्या बँक खात्यावर विनाविलंब काम सुरु करण्यासाठी रक्कम रू.१५,०००/- पहिला हप्ता जमा झाला. त्यामधून त्यांनी बांधकाम साहित्य खरेदी करून घरकुल बांधकामस सुरुवात केली. त्यानंतर ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी मुल्यमापन केल्या नंतर दुसरा हप्ता रक्कम रु.४५,०००/- त्यांच्या बँक खात्यावर Direct Beneficiary Transfer द्वारे जमा करण्यात आला. ह्या दरम्यान त्यांनी स्वतः सुद्धा त्यांच्या कडील पुर्वीची काही बचत व मित्र-नातेवाईक यांचे कडुन बाकी पैसे जमा करुन त्यांना हवे तसे घराचे बांधकाम केले. त्यानंतर तिसरा हप्ता हा S l a b लेव्हेलला रक्कम रु.४०,००० /- त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आला. तसेच शौचालयासह घरकुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर त्यांच्या बँक खात्यावर चौथा हप्ता रक्कम रू.२०,०००/- जमा करण्यात आला. त्यांना बांधकामाच्या टप्प्यानुसार शासनाकडून एकुण रक्कम रू.१,२०,०००/- अर्थसहाय्य मिळाले. त्यामुळे घरकुलाचे काम जलद गतीने व गुणवत्तापूर्ण झाले. घरकुल बांधकाम करतांना ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वेळोवेळी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या या मोलाच्या सहकार्यामुळे श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण झाले असून त्यांचे कुटुंब बिनधास्तपणे व आनंदाने घरात वास्तव्य करीत आहे.

महा आवास अभियानामध्ये विविध शासकीय योजनांशी कृतीसंगम करून योजनांचा देण्याचा महत्वाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांना फायदा झाला असून त्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी, उज्वला योजनेमधून गॅस, जल जीवन मिशन मधून पिण्याच्या पाण्यासाठी नळ कनेक्शन, इत्यादी योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत श्री.रामेश्वर साहेबराव फुके यांनी बांधलेले घरकुल संपूर्ण तालुक्यात आदर्श ठरले असून त्यांचे कुटुंब गुण्यागोविंदाने या आदर्श घरकुलात आपले संसार करीत आहे.





# नाशिक मधील निफाड तालुक्यात आदर्श घरकुलांची निर्मिती

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यापासून अगदी जवळच्या अंतरावर म्हणजे ५ किलो मीटरवर वसलेले १२ बलुतेदारांचे शिवडी गाव आहे. या गावची लोकसंख्या सन २०११ च्या जणगणनेनुसार ३०४७ इतकी असून यामध्ये १०० टक्के अनुसुचित जाती व जमातीचा लोकांचा गावात समावेश आहे. या गावामध्ये शेतकरी, मजूर व व्यवसायिक देखील वास्तव्यास आहेत. या गावात सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण 'ड ' यादीतील एकूण ५ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाली असून त्यापैकीच एक सुतार समाजाचे लाभार्थी श्री.सोमनाथ देवराम आहेर हे आहेत.

श्री.सोमनाथ देवराम आहेर हे सुमारे ३० ते ४० वर्षापासून शिवडी या गावात राहत असून कित्येक वर्षापासून घरकुलाच्या प्रतिक्षेत होते. असे हे वंचित लाभार्थी अनेक वर्षापासून एका गावकऱ्याच्या खाजगी जागेत पत्र्याचे कच्चे शेड उभारून भाडेतत्वावर वास्तव्य करत होते. त्यांना घरकुल बांधकामासाठी स्वतःची जागा नसल्यामुळे त्यांना घरकुल योजनेचा लाभ देणे शक्य नव्हते. याकरीता त्यांनी कित्येकदा ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क साधला. त्यांची घराविषयी तळमळ पाहून ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन त्यांना घरकुल देण्याचा निर्णय घेतला. त्यांची जागेची अडचण समजून घेवून ग्रामपंचायतीने गावठाण क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या मालकीची जागा श्री.सोमनाथ देवराम आहेर यांना घरकुल बांधकामासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. ग्रामस्थांनीसुध्दा ग्रामपंचायतीच्या या निर्णयाचे स्वागत करत संमती दर्शविली व श्री.सोमनाथ देवराम आहेर यांनी गावठाणाची जागा घरकुल बांधकामासाठी उपलब्ध करून दिली.यामुळे त्यांची घरकुल बांधकामासाठीची जागेची अडचण मार्गी लागली.

श्री.सोमनाथ देवराम आहेर यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध झाल्याने त्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजुर करण्यात आले. घरकुल मंजुर होताच त्यांना पहिला हप्ता त्यांच्या बँक खाती जमा करण्यात आला. त्यानुसार त्यांनी थोडाही विलंब न करता घरकुल बांधकामास सुरूवात केली. त्यांना घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार सर्व हप्ते वेळेत बँक खाती जमा करण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत मिळालेले अर्थसहाय्य व त्यांनी गेल्या ३० ते ४० वर्षात जमा केलेली पुंजी यातून त्यांनी घरकुलाचे बांधकाम अत्यंत अल्प कालावधीत पुर्ण केले. एखाद्या अलिशान राजवाड्याला लाजवेल असे हे आपले छोटेसे घरकुल त्यांनी सजवले. यामध्ये सर्व अत्याधुनिक सोई सुविधा त्यांनी या छोट्याश्या जागेत उपलब्ध करून घेण्याचा प्रयत्न केला. श्री.सोमनाथ देवराम आहेर यांची घरकुल बांधकाम सुरू असतांना गोल्डन कार्ड, उज्वला गॅस व विश्वकर्मा योजना, इत्याची नोंदणी करून घेतली.

श्री.सोमनाथ देवराम आहेर हे स्वतः सुतार काम करीत असून ते गावातील अत्यंत कुशल कारागीर असल्यामुळे त्यांनी आपले घरकुल सजविण्याकडे विशेष लक्ष दिले. यात त्यांनी जुने कौल वापरून पुढे घराला कौलारू गेटप देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच आपल्या सुतार काम कौशल्याचा वापर करून घराला लाकडी काम करून अजूनच मनमोहक बनवले आहे. त्यांचे घराला छोटे छोटे लाकडी पक्षांचे घरटे देखील पुढच्या बाजूने त्यांनी लावले असून या घरकुलाला ते आपले घरटेच मानतात. श्री.सोमनाथ देवराम आहेर यांनी उभारलेले हे आदर्श घरकुल सर्वांसाठी मॉडेल हाऊस ठरले आहे.

श्री.सोमनाथ देवराम आहेर यांना आदर्श घरकुल उभारण्याकरीता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती प्रतिभा संगमनेरे, निफाड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. महेश पाटील, यांनी वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले आहे. तसेच ग्रामपंचायतीचे आजी माजी सरपंच, उपसरपंच, सभासद, कर्मचारी व ग्रामस्थ यांच्या सर्वांच्या प्रयत्नातून हे मॉडेल हाऊस उभारण्यात यश आले आहे.





# मोदी आवास घरकुल योजनेमुळे अंधारलेल्या कुटुंबाला घरकुलाचा प्रकाश

इतिहास कालीन वारसा असलेल्या श्रीमंत छत्रपती शिवरायांच्या पावनभूमीत अजिंक्यतारा किल्ल्याच्या कुशीत विराजमान असलेली शाहुनगरी....!!! सातारा नगरपालीकेच्या हददी पासुन हाकेच्या अंतरावर वसलेले पानमळेवाडी हे गाव. या गावात **"मोदी आवास घरकुल योजना" मधील साकार झाले राज्यातील पहिले हक्काचे पक्के घरकुल पूर्ण ज्यामुळे श्रीमती जयश्री मारुती अवसरे** (MH-११-००-१३६-००१/MAGY४९०२७४७३) यांच्या अंधकारमय जीवनात घरकुलामुळे प्रकाशाची किरण आणि त्याच्या जीवनाला एक नवीन दिशा मिळाली.

पानमळेवाडी या ग्रामपंचायतीमध्ये श्री. मारुती ज्ञानदेव अवसरे त्यांच्या कुटुंबासमवेत पत्र्याच्या शेड मध्ये एका खोलीत निसर्गाशी सामना करीत वास्तव्य करत होते. पती-पत्नी दोघेही शिवणकाम करून आपली उपजिविका करत संसाराचा गाडा चालवत होते. मुलाचे शिक्षण सुरू असताना अशातच अचानक अनसरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. घरातील कर्ता व्यक्ती श्री.मारुती ज्ञानदेव अवसरे यांचा अकस्मात मृत्यु झाल्याने श्रीमती जयश्री अवसरे यांच्यावर कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी आली. मुलाच्या उज्वल भविष्याची चिंता त्यांना सतावू लागली आणि जीवनात नवीन संघर्षाने पदार्पण केले. श्रीमती जयश्री अवसरे यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधुन हक्काचा पक्का निवारा मिळेल अशी आशा होती. परंतु आवास प्लस प्रतिक्षा यादीत नाव असताना सुध्दा उद्दिष्टा अभावी घरकुल मंजूर होत नव्हते. घरकुल मंजूर होईल या आशेपोटी वारंवार ग्रामपंचायतीमध्ये विचारणा करणे, एवढेच काम शिल्लक राहिले होते.

अशातच राज्य शासनाने सन २०२३-२४ या वर्षी इतर मागास वर्गीयांकरीता करीता मोदी आवास घरकुल योजना सुरु केल्याचे श्रीमती जयश्री अवसरे यांना समजले. जात दाखला, उत्पन्न दाखला इत्यादी कागदपत्रांची पुर्तता करुन त्यांनी घरकुलाचा प्रस्ताव ग्रामसेविका श्रीमती मनिषा पुजारी यांचेकडे दिला. त्यांनी तातडीने ग्रामसभेच्या शिफारशीसह प्रस्ताव पंचायत समितीकडे आणि तेथून जिल्हास्तरावर पाठविण्यात आला. श्रीमती जयश्री अवसरे यांना अत्यंत अल्प कालावधीत मोदी आवास घरकुल योजनेमधून घरकुल मंजूर झाले. घरकुल मंजूर लाभार्थी मेळाव्यात त्यांना घरकुल बांधकाम, अकुशल मजूरी व शौचालय प्रोत्साहनपर अनुदान याविषयीची माहिती मिळाली. घरकुल मंजूरी आदेश मिळताच पतींनी जोडलेल्या माणुसकीच्या नात्यातील शुभचिंतक सदगृहस्थांच्या मदतीने व पतीने साठविलेल्या आर्थिक जमापुंजीच्या जोरावर घरकुलाचे काम सुरु केले. शासकीय अनुदानाची वाट न बघता बांधकामात खंड न पडता घरकुलाचे काम जलदगतीने पूर्ण केले. श्रीमती जयश्री अवसरे यांना घरकुल बांधकामासाठी अुनदान रु.१.२० लक्ष, अकुशल मजूरी रु.२४५७०/- व शौचालय प्रोत्साहन अनुदान रु.१२०००/- एवढा निधी मिळाला. त्यासोबतच वीज जोडणी, नळ जोडणी, गॅस जोडणी व उमेद अभियान अंतर्गत मुक्ताई स्वयं: सहायता समुहामुळे उपजीविकेचे साधन उपलब्ध झाले आहे. जिल्हास्तरीय अधिकारी यांनी या घरकुलाला भेट दिली असता सांगितले की, मोदी आवास घरकुल योजनेतील हे घरकुल राज्यातील पहिले कमी कालावधीत सर्व अभिसरण लाभासह पूर्ण झालेले आहे. याचा निश्चितच सातारा जिल्हयास अभिमान आहे.

या हक्काचे घरात मी व माझा मुलगा सुखाने वास्तव्य करीत आहे. सध्या मुलगा बी. कॉम. चे शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असून आपले सरकार सेवा केंद्रात रोजंदारीवर काम करुन कुटुबांसाठी हातभार लावत आहे. आम्हाला आता समाजव्यवस्थेत मान सन्मान मिळत आहे. हे परिवर्तन शासनाने दिलेल्या घरामुळे आमच्यात झाले. शासन विविध विकास योजनांच्या माध्यमातून आमच्या पाठीशी असलेची खात्री व प्रत्यय आलेला आहे. यामुळे आमच्या आत्मविश्वासात सुध्दा वृध्दी झाली आहे. यासाठी श्रीमती जयश्री अवसरे यांनी शासनाचे आभार मानले.





# शासकीय यंत्रणेच्या समन्वयातून पुर्नवसीत लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ

**आखवणे-भोम हे गाव कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वैभववाडी तालुक्यात असून** हे गांव अरुणा प्रकल्पाअंतर्गत बुडित क्षेत्रात जात असल्याने सदर लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभ देता येईल अगर कसे याबाबत संभ्रम निर्माण होता.त्याकरीता पंचायत समिती कार्यालयाने विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्हा पुर्नवसन अधिकारी यांचेशी वारंवार पत्रव्यहार करुन सदर लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभ मिळणेबाबत विनंती केली. त्यानुसार या गावातील एकुण ७० लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत निश्चित झाले.

सन २०११ च्या ब यादीतील आखवणे-भोम गावात प्रधानमंत्री आवास घरकुल योजना-ग्रामीण अंतर्गत एकुण ७० घरकुले प्रतिक्षा यादीत होती. त्यापैकी प्रथम २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये ६ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आणि या सर्व घरकुलांचे बांधकामही पूर्ण झाले आहे. त्यानंतर आखवणे-भोम गावांचे पुनर्वसन झाल्याने त्यांना मांगवली, कुसुर, उंबर्डे व किंजळीचा माळ-हेत या ठिकाणी हलविण्यात आले. त्यामुळे या सर्व घरकुल लाभार्थ्यांवर मिळालेल्या भुखंडावर पत्र्याच्या शेडमध्ये राहण्याची वेळ आली. सन २०१९-२० मध्ये ७० पैकी ५० लाभार्थ्यांची घरकुले मंजुर झाली.

सिंधुदुर्ग जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक यांच्या अध्यक्षतेखाली या सर्व घरकुल मंजुर लाभार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यात त्यांना घरकुल मंजुर झाल्यापासून मिळणारे अनुदान, बांधकामाचे टप्पे व घरकुल बांधकाम संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजुरी मिळाली, परंतु पुर्नवसन विभागाकडुन या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे पुर्नवसन अधिकारी व या सर्व लाभार्थ्यांची एकत्रित बैठक आयोजित करून घरकुल मंजुर झालेल्या लाभार्थ्यांना प्राधान्याने जागा वाटप करणेबाबत पुर्नवसन अधिकारी यांना विनंती करण्यात आली.



पुर्नवसन अधिकारी यांनी या सर्व लाभार्थ्यांची जागेची अडचण लक्षात घेवून शासनाकडुन त्वरीत प्लॉट वाटप करण्यात आले. या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध होताच या सर्व लाभार्थ्यांचे घरकुल भूमिपूजन एकाच दिवशी गट विकास अधिकारी यांच्या वतीने आयोजित करून तात्काळ घरकुल बांधकामास सुरूवात करण्यात आली.तसेच या सर्व लाभार्थ्यांच्या बँक खाती पहिला हप्ता पंचायत समिती कार्यालयाकडून जमा करण्यात आला.



या सर्व लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलाचे कामे अतिशय जलद गतीने पूर्ण केली असून अद्याप पर्यंत ५० पैकी ४८ घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहे. उर्वरीत २ घरकुलांचे काम प्रगतीत असून लवकरच पूर्ण होणार आहेत. तसेच उर्वरीत घरकुल लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हास्तरावर पाठविण्यात आले असून त्यांच्या घरकुल मंजूरी कार्यवाही प्रगतीत आहे. पूर्ण झालेल्या घरकुलांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण प्रमाणेच रमाई आवास योजने अंतर्गत मंजुर करण्यात आलेली ७ घरकुलांचे काम सुध्दा पूर्ण झाले आहे. या लाभार्थ्यांना पुर्नवसन विभाग तसेच प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व रमाई आवास योजने अंतर्गत मिळालेल्या रक्कमेतून घरकुलांचे बांधकाम मजबुत व दर्जेदार केले आहे. यामुळे त्यांची भविष्यात घराबाबतची चिंता दुर झाली असून अतिशय सुंदर अशा घरांची निर्मिती या लाभार्थ्यांनी केली आहे. हे सर्व लाभार्थी या घरकुलांमध्ये गुण्यागोविदाने व सन्मानाने वास्तव्य करीत आहेत.






: 17.630052
de: 74.565693
n: 716.75±24 m
y: 19.3 m
5-19-2024 17:19
mai awas gharakul Bhagvan Sawant
Powered by Note




शबरी आदिवासी घरकुल योजना
सन-२०२१-०२२


Latitude: 19.744277
Longitude: 76.684974
Elevation: 473.91±8 m
Accuracy: 5.2 m
Time: 18-06-2024 14:15
Note: Sundar dattrao kavde
may 22 .23 badnapur 4
Powered by NoteCam







# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत घरकुलांना निधी उपलब्ध करून द्या

**मनोहर चंद्रिकापुरे : अतुल सावे यांना दिले मागणीचे निवेदन**

लोकमत न्यूज नेटवर

**अर्जुनी-मोरगाव :** यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत सन २०२२-२३ व २३-२४ या वर्षातील वैयक्तिक घरकुल बांधकामाच्या प्रलंबित दायित्वाकरिता तसेच सन २०२३-२४ मधील ३६२ प्रस्तावांना शासन स्तरावरून कार्योत्तर मान्यता व निधी उपलब्ध करून देण्यात यावा या मागणीचे निवेदन आ. मनोहर चंद्रिकापुरे यांनी गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांना दिले.



अतुल सावे यांना निवेदन देताना आमदार मनोहर चंद्रिकापुरे व अन्य.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय समितीच्या सभेमध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या गोंदिया जिल्ह्यातील वैयक्तिक घर बांधकामाच्या प्रस्तावांना कार्योत्तर मान्यता व निधी वितरित करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यानुरूप शासन स्तरावरून सन २०२२-२३ च्या ५५२ प्रस्तावांना कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात आली असून, या प्रस्तावांपैकी २६६.८१६ लक्ष इतका निधी वितरित होणे शिल्लक आहे. सन २०२३-२४ मधील ३४३ प्रस्तावांना कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात आली असून, या प्रस्तावांपैकी २४७.७३६ लक्ष इतका निधी वितरित होणे शिल्लक आहे. एकूण ५१५.६३२ लक्ष निधी तसेच सन २०२३-२४ मधील वैयक्तिक घरकुल बांधकामाच्या ३६२ प्रस्तावांना शासन स्तरावरून कार्योत्तर मान्यता व त्याकरिता ४८९.४२४ लक्ष रुपये असे एकूण १००५.०५६ लक्ष निधी वितरित करण्याबाबत संबंधित विभागाचे मंत्री अतुल सावे यांना आ. मनोहर चंद्रिकापुरे यांनी गुरुवारी भेटून या योजनेअंतर्गत घरकुलाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी निवेदन दिले. यावर मंत्री सावे यांनी सकारात्मकता दर्शविली.

# विविध विकासकामांची वडगावमध्ये पाहणी

**वडगाव मावळ, ता. ७ :** विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांनी जांभूळ गावात भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली. मावळ पंचायत समितीलाही भेट देऊन अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

त्यांच्याबरोबर अतिरिक्त मुख्य कार्यकारी चंद्रकांत वाघमारे, प्रकल्प संचालक शालिनी कडू, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी गर्जे, मावळ पंचायत समितीचे प्रशासक सुधीर भागवत आदी उपस्थित होते. पुलकुंडवार यांनी जांभूळ येथील विविध विकास कामांची पाहणी केली. उमेदच्या माध्यमातून सिमांतीनी फाउंडेशनच्यामार्फत बनविण्यात येणाऱ्या उन्हाळी पदार्थ युनिटला भेट दिली व बचत गटाच्या महिलांशी संवाद साधला. जांभूळ येथील भास्कर ओव्हाळ या लाभार्थ्यांच्या २०२१-२२ मधील रमाई आवास घरकुलाला भेट देऊन लाभार्थ्यांशी योजनेबाबत चर्चा केली. पशुसंवर्धन विभागाच्या दवाखान्यास भेट देऊन तेथील कामाची पाहणी केली. पुलकुंडवार व मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांनी दवाखान्याच्या आवारात वृक्षारोपण केले. जांभूळ ग्रामपंचायत कार्यालयाला भेट दिली. ग्रामपंचायतीच्या उपक्रमाबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर वडगाव येथील मावळ पंचायत समिती कार्यालयाला त्यांनी प्रथमच भेट दिली. गट विकास अधिकारी सुधीर भागवत यांनी विविध विकासकामांची माहिती दिली. जिल्हा परिषदेच्या वतीने नव्याने बांधकाम केलेल्या व्यापारी संकुलाची पाहणी केली.



जांभूळ : येथील बचत गटाच्या महिलांशी संवाद साधताना विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील.



सातारा : सुधाकर भोसले यांचा गौरव करताना याशनी नागराजन, शेजारी जितेंद्र डुडी, संतोष हराळे व इतर.

# महाआवासमध्ये जिल्ह्याला १६ विभागीय पुरस्कार

सातारा, कोरेगाव, फलटण प्रांताधिकाऱ्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव

**सातारा, दि. २८ (प्रतिनिधी) -** महाआवास अभियान ग्रामीण २.०० यामध्ये विविध वर्गवारीत विभागीय स्तरावरील जाहीर झालेल्या २८ पुरस्कारांपैकी १६ पुरस्कार सातारा जिल्ह्यास प्राप्त झाले.

हे अभियान २०२२- २३ या आर्थिक वर्षात राबविण्यात आले होते. घरकुलपात्र भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याच्या वर्गवारीत सातारा, कोरेगाव, फलटण येथील प्रांताधिकाऱ्यांनी शासकीय जागा उपलब्ध करून देण्यात उत्कृष्ट काम केल्याबद्दल सुधाकर भोसले (सातारा), अभिजित नाईक (कोरेगाव) आणि सचिन ढोले (फलटण) या प्रांताधिकाऱ्यांना विभागीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त झाले. याबद्दल त्यांना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी व मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. जिल्ह्यातील आवास योजनेचे काम राज्यात गुणात्मक दर्जेदार असल्याचे सांगून जितेंद्र डुडी यांनी प्रकल्प संचालक संतोष हराळे व त्यांच्या टीमचे तसेच सर्व गट विकास अधिकाऱ्यांच्या कामाचे कौतुक केले. सर्व प्रांत व तहसीलदारांनी घरकुलासाठी भूमिहीन बेघर लाभार्थ्यांना शासकीय जागा उपलब्ध करून देण्याचे प्रस्ताव तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

राज्यातील विविध आवास योजनांना कार्यक्रम जलद गतीने पुढे जावा, लाभार्थींची गुणवत्तापूर्वक घरकुले बांधली जावीत या उद्देशाने ग्रामपंचायत, पंचायत, जिल्हा, विभाग अशा स्तरावर येथील कामाचे मूल्यमापन करून त्यामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देण्याकरिता विविध टप्प्यांवर प्रमाणपत्र व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येत आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.



गावातील घरकुल पहाणी करताना मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे व मान्यवर.

# सोनवडे गावास जिल्हा षरिषद अधिकाऱ्यांनी दिली भेट

चांदोली,ता.५(वार्ताहर)-

सांगली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे व उप मुख्यकार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे, गटविकास अधिकारी संतोष राऊत यांनी सोनवडे गावास भेट देवुन येथील ग्रामपंचायतीच्या वतीने गावामध्ये झालेल्या विविध विकास कामांची पहाणी केली.

सोनवडे येथील ग्रामपंचायतीच्यावतीने गावामध्ये मोदी आवास ,रमाई आवास,प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेतुन व दलीत वस्ती सुधार योजनेतुन पुर्णत्वास आलेल्या कामांची पहाणी करुन या कामाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी समाधान व्यक्त केले व यापुढेही शासनाच्या विविध योजना गावात प्रभावीपणे राबविण्याच्या सुचना ग्रामपंचायतीस दिल्या.

दरम्यान यावेळी सोनवडे गावच्या सरपंच सौ.सोनाली नाईक, ग्रामसेवक गणेश पेटकर, विक्रम पाटील,बदु कांबळे,सुशांत कदम यांचेसह महीला, पुरुष लाभार्थी उपस्थित होते.

# काम पूर्ण करा किंवा अनुदान परत करा

**प्रकल्प संचालकांचा निर्वाणीचा इशारा : इंदापूर तालुक्यात घरकुल आढावा बैठक**

लोकमत न्यूज नेटवर्क



लोकसभा मतदान जनजागृतीची शपथ घेताना महिला ग्रामसेवक व कर्मचाऱ्यांच्या महिला.

२ हजार ५५४ अपूर्ण घरकुले

आवास योजनांच्या अंमलबजावणीत वर्धा जिल्हा विभागात तिसरा

# अमृत महाआवास अभियान; जिल्ह्यातील लाभार्थ्यांना दिला १०,३२५ घरकुलांचा लाभ

लोकमत न्यूज नेटवर्क

भूमिहिनांना मिळतोय लाभ

# मोदी आवास योजनेचा लाभ हवाय? मग करा आता १० जुलैपर्यंत अर्ज

**ग्रामसभेमार्फत होणार निवड : छाननीनंतर अर्ज मान्यतेसाठी जाणार जिल्हास्तरावर**

लोकमत न्यूज नेटवर

**गोंदिया :** ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील ग्रामसभेमार्फत निवड करण्यात आलेल्या पात्र कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी राज्यशासनाने मोदी आवास योजना राबविण्यास मंजुरी दिली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांना १० जुलैपर्यंत अर्ज करता येणार आहे.

या योजनेअंतर्गत ग्रामसभेमार्फत निवड करण्यात आलेल्या इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील पात्र कुटुंबांना नवीन घर बांधण्यासाठी अथवा अस्तित्वात असलेल्या कच्च्या घराचे पक्क्या घरात रूपांतर करण्यासाठी घरकुल योजनेअंतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या डोंगराळ, दुर्गम भाग क्षेत्रामध्ये घरकुल बांधकामाकरिता प्रतिघरकुल १ लाख ३० हजार रुपये व सर्वसाधारण क्षेत्राकरिता प्रतिघरकुल १ लाख २० हजार रुपये अर्थसाहाय्य मंजूर करण्यात येते. या योजनेअंतर्गत प्राधान्यक्रमानुसार ग्रामसभेमार्फत लाभार्थ्यांची निवड करावयाची आहे. ग्रामसभेमार्फत निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची छाननी तालुका स्तरावर गट विकास अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येईल.



## लाभार्थी पात्रतेचे हे आहेत निकष

- लाभार्थी महाराष्ट्र राज्यातील इतर मागास प्रवर्गातील असावा. लाभार्थ्याचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षे असावे. वार्षिक उत्पन्न १ लाख २० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. लाभार्थ्याचे स्वत:च्या अथवा कुटुंबीयांच्या मालकीचे राज्यात पक्के घर नसावे. लाभार्थ्याकडे स्वत:ची अथवा शासनाने दिलेली जमीन असणे आवश्यक आहे अथवा त्यांचे स्वत:चे कच्चे घर असलेल्या ठिकाणी घर बांधता येईल. लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात अन्यत्र कोठेही शासनाच्या कोणत्याही गृहनिर्माण, गृहकर्ज योजनांचा लाभ घेतलेला नसावा. एकदा लाभ घेतल्यानंतर लाभार्थी पुन:श्च योजनेचा लाभ घेण्यास पात्र असणार नाही. लाभार्थी हा प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गतच्या कायमस्वरूपी प्रतीक्षा यादीमध्ये समाविष्ट नसावा.

## यांना असेल योजनेत प्राधान्य

- घरात कोणीही कमावत नाही अशा विधवा परितक्त्या महिला, कुटुंब प्रमुख. पूरग्रस्त क्षेत्रामधील लाभार्थी अथवा पीडित लाभार्थी. जातीय दंगलीमुळे घराचे नुकसान (आग व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती. नैसर्गिक आपत्तीबाधित व्यक्ती. तसेच दिव्यांगासाठी ५ टक्के राखीव.

## ही कागदपत्रे आवश्यक कागदपत्रे

- सातबारा उतारा, मालमत्ता नोंदपत्र, ग्रामपंचायतमधील मालमत्ता नोंदवहीतील उतारा अथवा ग्रामपंचायत प्रमाणपत्र, सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची छायांकितप्रत, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख २० हजार रुपयांपेक्षा कमी असल्याचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र, आधारकार्ड, रेशन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, विद्युत बिल, मनरेगा जॉब कार्ड, लाभार्थ्याच्या स्वत:च्या नावे वापरात असलेल्या बचत खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत.

# अपूर्ण घरकुलाची कामे तातडीने पूर्ण करा अन्यथा घरकुले रद्द करा

**प्रकल्प संचालक केंद्रे यांचा ग्रामसेवकांना इशारा**



# खाद्यपदार्थांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू

**विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांचे बचत गटांना आश्वासन**

पाण्याच्या टाक्या, घरकुलाची पाहणी...



मंचर (ता. आंबेगाव) : पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी अवसरी खुर्द येथे जाऊन दत्तकृपा स्वयंसहायता महिला बचत गटाने बनवलेल्या पदार्थांचा आस्वाद घेतला.

# शबरी, रमाई योजनेसाठी अर्ज केला का? घरकुल घ्या घरकुल

**उद्दिष्ट अधिक, मागणी कमी : घरकुल बांधायला जागा नसल्याने मागणीच नाही**

# सिंगल यूज प्लास्टिक से बनाया जा सकता है खूबसूरत मकान

- प्रधानमंत्री आवास योजना के तहत इको-फ्रेंडली 'डेमो हाउस' का निर्माण
- जिला ग्रामीण विकास विभाग की ओर से चलाया जाएगा 'भविष्य का घर' उपक्रम

संवाददाता | चंद्रपुर

किसी को भी आसानी से यकीन नहीं होगा कि प्लास्टिक के कचरे से घर बनाया जा सकता है। लेकिन सिंगल यूज प्लास्टिक से अपने भविष्य का घर बना सकते हैं, यह जिला ग्रामीण विकास प्रणाली ने एक अभिनव पहल के माध्यम से दिखाया है। विसापुर के श्रद्धेय अटल बिहारी वाजपेई बॉटनिकल गार्डन में प्रधानमंत्री आवास योजना के तहत इको-फ्रेंडली डेमो हाउस का निर्माण किया गया है।



दैनिक जीवन में उपयोग होने वाला प्लास्टिक कचरे को नष्ट होने में वर्षों लगते हैं। इसे ध्यान में रखते हुए, जिला परिषद चंद्रपुर और रेन आई अपसाइक्लिंग कंपनी चंद्रपुर के सहयोग से प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण डेमो हाउस कंस्ट्रक्शन के तहत एक भविष्य का घर बनाया गया है। इको-फ्रेंडली 'डेमो हाउस' की संकल्पना जिले के पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, जिलाधिकारी विनय गौडा और जिप सीईओ विवेक जॉनसन की है। उसके लिए वन विभाग की ओर से बॉटनिकल गार्डन में 625 वर्ग फीट जगह उपलब्ध कराई गई थी। जिला ग्रामीण विकास चंद्रपुर और डॉ. बालमुकुंद पालीवाल का डेमो हाउस रेन आई अपसाइक्लिंग कंपनी के सहयोग से बनाया गया है। 13 टन सिंगल यूज प्लास्टिक से 19 फीट ऊंची और 10 फीट साइड की दीवारों के साथ 625 वर्ग फीट के क्षेत्र में प्लास्टिक को अपसाइक्लिंग करके यह निर्माण किया गया है। दीवारों से लेकर छत तक की पूरी संरचना सभी प्रकार की अपसाइकल प्लास्टिक सामग्री का उपयोग करके बनाई गई है।

## घरकुल निर्माण के लिए बेहतर विकल्प

घरकुल निर्माण में लगने वाले ईंट, सीमेंट, रेत और लोहा के दाम बढ़ते जा रहे हैं। नतीजा घरकुल निर्माण में अनेक प्रकार की मुश्किलें आ रही हैं। इसलिए घरकुल निर्माण के लिए इसका उपयोग किया जाये तो यह इको-फ्रेंडली रहेगा। ग्रामीण परिसर का वेस्ट प्लास्टिक बचत समूह संस्था जमा कर दे तो विविध वस्तुएं तैयार करने की जानकारी डॉ. पालीवाल ने दी है। इस सिंगल यूज प्लास्टिक से भविष्य का घर बनाने की अपील जिला ग्रामीण विकास के प्रकल्प संचालक डॉ. तुषार पवार ने की है।

# मोदी आवास योजनेच्या घरकुलाचे बांधकाम रखडले!

**अनुदानाला लागली कात्री : लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळणार कसे**



काहींनी बांधकामाचा शुभारंभ केला नाही

१३४५ घरकुलांचे बांधकाम ठप्प

# ४१ हजार घरकुलांच्या बांधकामाकरिता 'स्पेशल ड्राईव्ह'

**१३ ते १८ मे दरम्यान गावस्तरावर अधिकाऱ्यांचे नियंत्रण** | **शंभरहून अधिक कर्मचाऱ्यांवर जबाबदारी**

पुण्य नगरी / प्रतिनिधी

**अमरावती :** जिल्ह्यात सन २०१६ ते २०२४ दरम्यान ४१ हजार ४८३ घरकुलांची कामे अर्धवट असल्याने ती पूर्ण करण्याकरिता आता १८ मेपर्यंत अल्टिमेटम देण्यात आला असून १३ ते १८ मे दरम्यान यकरिता विशेष मोहीम सीईओ संतोष जोशी यांच्या आदेशावरून राबविली जात आहे. या यकरिता गृहनिर्माण अभियंता, स्थापत्य अभियंता, तालुकास्तरावर गटविकास अधिकारी, सहायक गटविकास अधिकारी आदी सुमारे शंभरहून अधिक अधिकारी, कर्मचाऱ्यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

जिल्ह्यात अर्धवट घरकुलांची संख्या अधिक असल्याने यावाबत शासनाकडूनदेखील त्या पूर्ण करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहे. यापूर्वी एकाच दिवशी १४ खातेप्रमुखांनी २८ ग्रामपंचायतींची व्हिजीट करून पाहणी केली होती. आता सीईओ तथा मुख्य प्रशासक संतोष जोशी यांच्या आदेशावरून घरकुलांची कामे पूर्ण करण्याकरिता ॲक्शन प्लॅन तयार करण्यात आला आहे. सन २०१६-१७ ते २०२३-२०२४

> जिल्ह्यात अर्धवट घरकुलांची संख्या पाहता, यापूर्वी १४ खातेप्रमुखांकडून २८ ग्रामपंचायतींना भेटी देण्यात आल्या आहेत. तर आता १३ ते १८ मे दरम्यान विशेष मोहीम राबविली आहे. याकरिता जिल्हा ते तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहे. यामधून जास्तीत जास्त घरकुलांच्या कामांना गती येईल
>
> **संतोष जोशी, सीईओ, अमरावती**

या दरम्यान केंद्रातील ११ हजार १९९ व राज्यशासनाचे ३० हजार २८२ अशी एकूण ४१ हजार ४८३ घरकुलांचे कामे रखडली आहेत. ती पूर्ण करण्याकरिता गावस्तरावर १३ ते १८ मे या पाच दिवसांत ड्राइव्ह घेतल्या जात आहे. यामध्ये ६२ ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, स्थापत्य अभियंता २८ यासह १४ बीडीओ, १४ सहाय्यक बीडीओ आदी अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग राहणार आहे. या पाच दिवसात घरकुलांची कामे कशी मार्गी लागतील, याकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले. यामध्ये सीईओ संतोष जोशी यांनी सूक्ष्म नियोजन केले आहे. प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची मोहीम जिल्ह्यात राबविली जात आहे.

# बाभूळगावात सात वर्षांत मिळाला ३४७२ गरिबांच्या स्वप्नाला आकार

**विविध योजनांच्या लाभातून बांधली घरे : काही ठिकाणची कामे प्रगतिपर**

# पाच दिवसांत १,०७७ घरकुलांचे काम पूर्ण

**विशेष मोहिमेत लाभार्थ्यांचा प्रतिसाद**

**अचलपूर तालुक्यात सर्वाधिक घरकुलांचे बांधकाम**

पुण्य नगरी / प्रतिनिधी

**अमरावती :** जिल्ह्यात सन २०१६ ते २०२४ दरम्यान ४१ हजार ४८३ घरकुलांची कामे अर्धवट असल्याने ती पूर्ण करण्याकरिता १३ ते १८ मेदरम्यान विशेष मोहीम राबविण्यात आली होती. या मोहिमेत लाभार्थ्यांनी प्रतिसाद देत १,०७७ घरकुलांची कामे पूर्ण करण्यात आले आहे. तर येत्या महिन्यात यातील मोठ्या प्रमाणात अर्धवट घरकुल पूर्ण केली जाणार असल्याचे प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांनी सांगितले.

जिल्ह्यात अर्धवट घरकुलांची संख्या अधिक असल्याने याबाबत शासनाकडूनदेखील त्या पूर्ण करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहे. यापूर्वी एकाच दिवशी १४ खातेप्रमुखांनी २८ ग्रामपंचायतींची व्हिजीट करून पाहणी केली होती. सन २०१६-१७ ते २०२३-२०२४ या दरम्यान केंद्रातील ११ हजार १९९ व राज्य शासनाचे ३० हजार २८२ अशी एकूण ४१ हजार ४८३ घरकुलांचे काम रखडली आहेत.

> या पाच दिवसांत घरकुलांची कामे कशी मार्गी लागतील, याकडे लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. यामध्ये गृहनिर्माण अभियंत्यांसह सर्वांनीच चांगली कामगिरी केली. पाच दिवसात १,०७७ घरकुल पूर्ण झाले असून ३० मेपर्यंत यात आणखी मोठ्या प्रमाणात वाढ होईल. अर्धवट आणि रखडलेल्या घरकुल बांधकामांकरिता लक्ष केंद्रीत करून या विभागाच्या वतीने उपक्रम राबविले जाईल.
>
> **प्रीती देशमुख, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**

ती पूर्ण करण्याकरिता सीईओ संतोष जोशी यांच्या मार्गदर्शनात व प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांच्या नेतृत्वामध्ये १३ ते १८ मे या पाच दिवसांत ड्राईव्ह घेण्यात आला. यामध्ये ६२ ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, स्थापत्य अभियंता २८ यासह १४ बीडीओ, १४ सहाय्यक बीडीओ आदी शंभरहून अधिक अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग होता. याला लाभार्थ्यांनी प्रतिसाद देत या पाच दिवसांतच केंद्रातील २५० व राज्य शासनाच्या योजनेतील ८२७ अशी एकूण १०७७ घरकुलांची कामे पूर्ण करण्यात आले आहे. यामध्ये अचलपूर तालुका अव्वल असून येथे सर्वाधिक १४६ घरकुल पूर्ण करण्यात आली आहे. त्या पाठोपाठ दर्यापूर तालुक्यात १३३, मोर्शी तालुक्यात १०५ घरकुलांची कामे पूर्ण करण्यात आली आहे.

घरकुल योजनांचा फायदा; राज्य व केंद्राकडून मिळाली मदत

# आठ वर्षांत साठ हजार लाभार्थी; गरिबांच्या घराचं स्वप्न झालं पूर्ण

स्टोरी एक्सप्लेन

प्रधानमंत्री योजनेत ३८ हजार लाभार्थी

वसाहत योजनेचा घेतला फायदा

जिल्ह्यातील घरकुल योजनांचा आढावा

# जिल्ह्यातील २५ हजार बेघरांना मिळाला हक्काचा निवारा

**२,९५० घरकुले अपूर्ण : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेची माहिती**

सातारा : पुढारी वृत्तसेवा

तालुकानिहाय अपूर्ण कामांची आकडेवारी

गरजेपोटी ८ हजार ब्रासने रेती घेण्याची वेळ : स्वस्तातील वाळू धोरणाचे घराचे स्वप्न धुळीस

# पाच डेपो झाले निश्चित; पण सुरू केव्हा हे सांगता नाही येणार!

**'झेडपी'कडून १४ अधिकाऱ्यांची नियुक्ती** | **अर्धवट घरकुलांचा ९ मे रोजी पाहणी दौरा**

# २८ ग्रामपंचायतींची होणार सरप्राईज व्हिजीट

पुण्य नगरी / प्रतिनिधी

# ओबीसी, एससीसीकरिता घरकुलाचे उद्दिष्ट वाढवून मिळणार

लोकमत न्यूज नेटवर

**गोंदिया :** ओबीसी, एससीसी आणि एनटी प्रवर्गातील घरकुलांचा लक्षांक ग्रामपंचायतींना ग्रामसभेत घेऊन निश्चित करण्यासाठी मुभा दिली आहे. याशिवाय प्रलंबित 'ड' यादीमध्ये नाव समावेश नसेल तरीसुद्धा आता ग्रामसभेच्या माध्यमातून अतिगरजूंना तातडीने घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्याकरिता ग्रामपंचायतींना अधिकार प्राप्त झालेला आहे. गरजू अतिगरजू यांना प्राधान्य देण्यासाठी यादीमध्ये बदल करण्याच्यासुद्धा अधिकार ग्रामसभेला आहे. गोंदिया जिल्ह्यासाठी ओबीसी, एससीसी आणि एनटी प्रवर्गातील नागरिकांसाठी लक्षांक वाढवून मिळाल्याने घरकुल लाभार्थ्यांची प्रतीक्षा संपणार असल्याचा आ. विनोद अग्रवाल यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

ग्रामीण क्षेत्रातील नागरिकांच्या सर्वात जिव्हाळ्याचा विषय म्हणजेच घरकुल. यासाठी केंद्र शासन तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने विविध योजना आणि विभागांच्या माध्यमातून नागरिकांना पक्के घर देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. प्रत्येक घटकापर्यंत या योजनेचा लाभ मिळावा, यासाठी जातीच्या प्रवर्गानुसार घरकुलाचा लक्षांक निर्धारित केला जातो; परंतु प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये वेगवेगळ्या जाती प्रवर्गाची लोकसंख्या वेगवेगळी असल्याने एका विशिष्ट प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आलेला लक्षांक वापरला जात नसून इतर जाती प्रवर्गाची संख्या जास्त असल्याने त्या जाती प्रवर्गातील नागरिकांना पुरेपूर लाभ मिळत नव्हता. याचीच दखल घेत आ. विनोद अग्रवाल यांनी ही समस्या शासनदरबारी मांडली. त्यावर शासनाने आता सकारात्मक निर्णय घेतला आहे. यासंबंधीचे शासन निर्णयसुद्धा शासनाकडून काढण्यात आला आहे. या निर्णयासाठी आ. विनोद अग्रवाल यांनी सतत पाठपुरावा केला होता. त्याला आता यश आले आहे. या निर्णयासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार व सहकार मंत्री अतुल सावे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

## या निर्णयाने ग्रामपंचायतींना मिळणार बळ

- यापुढे ग्रामपंचायती त्यांच्या क्षेत्रातील लोकसंख्येचे अंदाज बांधून जातीय प्रवर्गातील नागरिकांना लाभ घरकुलाचे मिळवून देण्यासाठी सक्षम ठरणार आहे. ग्राम पंचायत स्वायत्त संस्था असल्याने यादृष्टीने ग्रामपंचायतींना बळ मिळणार आहे.




आवास सॉफ्ट प्रणालीच्या राज्यस्तरीय तांत्रीक मार्गदर्शन कार्यशाळे प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे



आवास सॉफ्ट प्रणालीच्या राज्यस्तरीय तांत्रिक मार्गदर्शन कार्यशाळे प्रसंगी NIC नवी दिल्ली यांचेकडील श्री.नरेंद्र कुमार यांचे स्वागत करतांना संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे




आवास सॉफ्ट प्रणालीच्या राज्यस्तरीय तांत्रीक मार्गदर्शन कार्यशाळे प्रसंगी NIC नवी दिल्ली यांचेकडील श्री.दिपक शुक्ला यांचे स्वागत करतांना संचालक, ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे



आवास सॉफ्ट प्रणालीच्या राज्यस्तरीय तांत्रीक मार्गदर्शन कार्यशाळे प्रसंगी उपस्थित राज्यस्तरीय अधिकारी, विभाग व जिल्हास्तरीय प्रोग्रामर

“महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
राज्यातील सर्वांसाठी आवास”




**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
दुरध्वनी क्रमांक - ०२२ - २७५६१८२४, महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९
ईमेल - directoriayruralhousing@gmail.com, संकेतस्थळ - www.mahaawaas.org